SHRI SHIVAJI EDUCATION SOCIETY, AMRAVATI'S
DR. PANJABRAO DESHMUKH NURSING INSTITUTE
SHIVAJI NAGAR AMRAVATI (M.S.) INDIA -444603

Ref No. PDNI/ /2025
mail: pdeshmukh070@gmail.com

Date: 18/09/25
Ph: 7212551164

# NOTICE

## Participation in MUHS-Organized Zonal-Interzonal Sports Events

All students are hereby instructed that as per the circular of MUHS (**MUHS/SW/Sports/1466/2025**), received on date **17/09/25** **(All India West Zone Inter University)** is organizing inter-university sports event on the date **6/10/2025**. Those who are interested to participate are requested to submit their names as early as possible before last date. For any queries regarding trials, eligibility, or selection criteria, please contact to **Mrs. Anuradha Wankhade (Student Welfare Secretary)**.

**Sports Categories:**

Kabaddi, Kho-Kho, Volleyball, Basketball, Athletics (Long Jump, High Jump, Triple Jump, Throwball, Disc Throw, Javelin Throw)

**Last date of submission: - 19/09/2025**

18/09/25

**Ms. Anuradha Wankhade**
**Secretory, Student welfare committee,**
**Date:** 18/09/25
**Place:** Amravati

V P
Principal 18/09/25
PRINCIPAL
Dr. P. D. Nursing Institute
Amravati.

Scanned with OKEN Scanner

**SSES, Amravati**

**Dr. Panjabrao Deshmukh Nursing Institute, Amravati**

**Circular- 01/2025**

Date: 16.09.2025

To,

The HOD's,

UG & PG,

Dr. PDNI, Amravati

**Subject:** Request to Conduct Student Welfare Awareness Program for Students (Academic Year 2025-26) and Submit the Report along with geotagged photos for NAAC purpose.

As per the above-mentioned subject, it has been informed to the below listed HOD's (UG & PG) to conduct Student Welfare Awareness Program for Students and Submit the Report along with geotagged photos for NAAC purpose on or before 31/10/2025 to Ms. Anuradha Wankhade.

| Sl. No | Name of the HOD's | Sign |
|---|---|---|
| 1 | Mr. Prabhudas Raiborde | [signature] |
| 2 | Ms. Mahima Alekar | [signature] |
| 3 | Ms. Priyanka Adhau | [signature] |
| 4 | Mr. Sandesh Sonawane | for [signature] 18/9/25 |
| 5 | Ms. Swati Gaiki | [signature] 18/09/25 |
| 6 | Ms. Jayashree Sherekar | [signature] |

V P 16/09/25

**Principal**

**Dr. Veda Vivek**

Principal
Dr. Panjabrao Deshmukh
Nursing Institute, Am

Scanned with OKEN Scanner

SHRI SHIVAJI EDUCATION SOCIETY, AMRAVATI'S
DR. PANJABRAO DESHMUKH NURSING INSTITUTE
SHIVAJI NAGAR AMRAVATI (M.S.) INDIA -444603

Ref No. PDNI/ /2025
mail: pdeshmukh070@gmail.com

Date: 16/09/2025
Ph: 7212551164

# NOTICE

## Participation in AIU-Organized Sports Events

All students are hereby instructed that as per the circular of MUHS (**MUHS/SW/Sports/1452/2025**), Association of Indian Universities (AIU) is organizing inter-university sports even. Those who are interested to participate are requested to submit their names as early as possible before last date. For any queries regarding trials, eligibility, or selection criteria, please contact to **Mrs. Anuradha Wankhade Madam (Sport Welfare Secretary)**.

**Sports Categories:**

Badminton, Table tennis, Chess, Swimming, Lawn tennis, Yoga

**Last date of submission: - 19/09/2025**

VP 16/09/2025

Principal

Principal
Dr.P.D.N.I., Amravati

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK
MUHS
दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004
Tel:(0253) 2539172/6659172/169 ☎ Student Helpline:0253-2539111/6659111/100
Website: www.muhs.ac.in, E-mail: sw@muhs.ac.in

डॉ. राजेंद्र शिवाजी बंगाळ
एम.बी.बी.एस, एम.डी.(न्यायवैद्यकशास्त्र),डी.एन.बी, एल.एल.बी.
कुलसचिव

Dr. Rajendra Shivaji Bangal
M.B.B.S, M.D.( Forensic Medicine), D.N.B, L.L.B.
Registrar

मआविवि/एसडब्ल्यू/स्पोर्टस/१४६६ /२०२५ — दि.१७ /०९/२०२५

"परिपत्रक क्र. -२८ /२०२५"

प्रति,
मा. अधिष्ठाता/प्राचार्य,
विद्यापीठसंलग्नीत सर्व महाविद्यालये
मआविवि, नाशिक.

## क्रीडा महोत्सव २०२५

महोदय/ महोदया,

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कार्यक्षेत्र हे सपुर्ण महाराष्ट्र राज्य असुन विविध आरोग्य विज्ञानाच्या विद्याशाखांची महाविद्यालये विद्यापीठाशी संलग्नित आहे. विद्यापीठाद्वारे खेळाडु विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व क्रीडा प्रकारांना वाव मिळावा, तसेच चालना मिळावी व त्यांना आपले कौशल्य दाखविण्याची संधी मिळावी, म्हणुन विद्यापीठ सातत्याने मा. कुलपती तथा महाराष्ट्र राज्याचे महामहिम राज्यपाल यांच्याद्वारे दरवर्षी आयोजित होणाऱ्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सवाकरीता, तसेच भारतीय विद्यापीठ संघ यांच्यामार्फत आयोजीत होणाऱ्या अखिल भारतीय पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ (All India West Zone Inter University) क्रीडा स्पर्धा व अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेमध्ये विद्यापीठाचा संघ पाठविण्यात येत असतो. सदर संघ पाठविण्यापूर्वी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ संघाची निवड हि राज्यातील प्रत्येक महसूल विभागातील (मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नागपुर, व अमरावती) विद्यापीठ कार्यक्षेत्रानुसार सहा विभागांमधुन करण्यात येत असते.

त्याअनुषंगाने मा. कुलपती तथा महाराष्ट्र राज्याचे महामहिम राज्यपाल यांच्याद्वारे दरवर्षी महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सवाचे आयोजन राज्यातील विविध विद्यापीठांमध्ये करण्यात येते. त्याअनुषंगाने नमूद करण्यात येते की, महामहिम राज्यपाल यांचे प्रधान सचिव यांच्या कार्यालयाने नमूद केल्याप्रमाणे या वर्षीचा क्रीडा महोत्सव " स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ, नांदेड " येथे आयोजित होणार आहे. सदर क्रीडा महोत्सवाचे आयोजन तारखा अंदाजीत असल्याने शासनाकडून निश्चित तारखा प्राप्त झाल्यानंतर आयोजनाच्या तारखा परीपत्रकाद्वारे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

## १. क्रीडा प्रकार (Event) :

सदर क्रीडा महोत्सवाच्या अनुषंगाने सर्वसाधारणपणे खालील क्रीडा प्रकाराची निवड चाचणीचे आयोजन करण्यात येते.

| अ.क्र | मुख्य पाच क्रीडा प्रकाराचे नांव |
|---|---|
| १ | कबड्डी |
| २ | खो-खो |
| ३ | व्हॉलीबॉल |
| ४ | बास्केटबॉल |
| ५ | ॲथलेटिक्स - १०० मी, २०० मी, ४०० मी, ८०० मी, १५०० मी, ५००० मी.<br>- ४×१०० मी. रिले आणि ४×४०० मी रिले, लांब उडी, उंच उडी, तिहेरी उडी<br>- गोळा फेक, थाळी फेक, भाला फेक, |
| | जास्तीत जास्त विद्यार्थी संख्या - ३८ (मुले आणि मुली)<br>संघ व्यवस्थापक - ०१ पुरुष<br>संघ व्यवस्थापक - ०१ स्त्री<br>एकूण - ४० |

(टिप - उक्त तक्त्यामध्ये (अ.क्र.१ ते ५) नमूद क्रीडा प्रकारांसाठी एका महाविद्यालयातून म्हणजेच एका महाविद्यालयाचा जास्तीत जास्त ४० व्यक्तिचा संघ असावा.)

सदर सर्व क्रीडा प्रकारात मुले व मुली सहभागी होवू शकतात. ज्या महाविद्यालयातून कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल व ॲथलेटिक्स या क्रीडा प्रकारासाठी संपुर्ण संघ उपलब्ध नसल्यास, अशा महाविद्यालयांनी कमीत-कमी तीन ते चार खेळाडू निवडचाचणीसाठी पाठविले तरी चालतील.

त्यानुसार विभागीय निवड चाचणी व आंतरविभागीय निवड चाचणी, आयोजन करण्यात आले असुन त्यासंबंधीचे वेळापत्रक खालीलप्रमाणे.

### -:विभागीय क्रीडा स्पर्धेचे वेळापत्रकः-

| अ.क्र. | विभाग | स्पर्धेचे ठिकाण | दिनांक | महाविद्यालय जबाबदार व्यक्ती/ समन्वयक |
|---|---|---|---|---|
| १ | **मुंबई** | बी.के.एल. वालावलकर रुरल वैद्यकीय महाविद्यालय, रत्नागिरी | २९ ते ३० सप्टेंबर २०२५ | प्रा. श्रीकांत पराडकर (९८२२६३९३०६) |
| ०२ | **पुणे** | साई आयुर्वेद वैद्यकीय महाविद्यालय, वैराग, सोलापुर | २४ ते २५ सप्टेंबर २०२५ | प्रा. बालाजी दलवे (७७७६८११६८४) |
| ०३ | **नाशिक** | सिंधुताई विखे पाटील नर्सिंग महाविद्यालय, नाशिक | २९ ते ३० सप्टेंबर २०२५ | श्री मंगेश पावसे (७०५८५१२०५६) |
| ०४ | **छत्रपती संभाजीनगर** | गुरु मिश्री होमिओपॅथी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर | ०३ ते ०४ ऑक्टोबर २०२५ | श्री गोविंद थोटे (७५८८८५०२०९) |
| ०५ | **नागपुर** | व्ही.एस.पी.एम. दंत महाविद्यालय, नागपुर | ०६ ते ०७ ऑक्टोबर २०२५ | प्रा. मनोज मराठे (७३८५५१५४९७) |
| ०६ | **अमरावती** | सरस्वती इन्स्टिटयुट ऑफ नर्सिंग सायन्सेस महाविद्यालय, अमरावती | ०६ ते ०७ ऑक्टोबर २०२५ | श्री सुरज निचल (९८९३५१८६२८) |

## -: आंतरविभागीय क्रीडा स्पर्धेचे वेळापत्रक:-

| अ. क्र. | स्पर्धेचे ठिकाण | दिनांक | जबाबदार व्यक्ती / समन्वयक |
|---|---|---|---|
| ०१ | मा. श्री. अण्णासाहेब डांगे आयुर्वेद महाविद्यालय, आष्टा, जि. सांगली | ०९ ते १० ऑक्टोबर २०२५ | डॉ सुशांत कणसे (८३०८२२५९६०) |

**२. प्रवेशिका** (Nominal Roll of Players)

विभागीय क्रीडा स्पर्धा निवड चाचणीमध्ये सहभाग घेण्याच्या अनुषंगाने महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन संघात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहीत करावे. विभागीय निवड चाचणीसाठी संघ पाठविण्यास इच्छुक असलेल्या महाविद्यालयाने, त्यांच्या खेळाडूंची प्रवेशिका, ज्यामध्ये महाविद्यालयाचे नांव, संघव्यवस्थापकाचे नांव, खेळाडु मुलांची व मुलींची नावे इत्यादी माहीती सोबत जोडण्यात आलेल्या प्रवेशिका **परीशिष्ट "अ" (Nominal Roll of Players : Annexure – "A"). मध्ये भरुन दि.२१ सप्टेंबर २०२५ रोजी किंवा त्यापुर्वी संबंधीत विभागीय समन्वयकांना (आयोजक महाविद्यालयाकडे) पत्र / ई-मेलद्वारे पाठवावीत.** तसेच, महाविद्यालयाचे अधिष्ठाता / प्राचार्य यांनी संघातील खेळाडू विद्यार्थ्यांची संख्या आणि त्यांची आगमनाची वेळ संबंधीत विभागीय समन्वयकांना कळवावी. जेणेकरुन आयोजकांना प्रशासकीय व्यवस्थेचे नियोजन आणि तयारी करता यईल. जे महाविलद्यालये आपल्या संघांची प्रवेशीका अंतिम तारखेपर्यंत न पाठवता थेट निवड चाचणीसाठी आल्यास, अशा संघांना सहभागी होण्याची परवानगी दिली जाणार नाही. तथापी, अपवादात्मक परीस्थितीमध्ये सहभाग घेण्याच्या दृष्टीने विभागीय समन्वयक यांचा अंतिम निर्णय असेल.

**३. विभागीय निवड चाचणी** (Zonal Selection Trials)

वरील सर्व खेळांसाठी विभागीय निवड चाचण्या या आयोजक महाविद्यालयांमध्ये विभागनिहाय घेतल्या जातील. विभागीय चाचणी सुरळीत पार पाडण्यासाठी योग्य व्यवस्था करणे ही आयोजक महाविद्यालयाची जबाबदारी असेल. तसेच, सहभागी होणाऱ्या संघ व्यवस्थापक आणि विद्यार्थ्यांनी देखील आयोजक महाविद्यालयांना सहकार्य करावे. प्रत्येक विभागामधील जिल्हयांचा तपशिल खालील तक्त्यात नमुद करण्यात आलेला आहे.

**विद्यापीठ क्षेत्राचे विभाजन**
**(सहा महसूल विभागनिहाय जिल्हयांचा तपशिल)**

| अ.क्र. | विभाग | जिल्यांचा समावेश |
|---|---|---|
| १ | मुंबई | मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पालघर, रत्नागीरी, रायगड, सिंधुदुर्ग या जिल्यातील महाविद्यालये |
| २ | पूणे | पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर या जिल्यातील महाविद्यालये |
| ३ | नाशिक | नाशिक ,अहमदनगर, जळगाव, धुळे, नंदुरबार या जिल्यातील महाविद्यालये |
| ४ | छत्रपती संभाजीनगर | छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, जालना, नांदेड, परभणी, बीड, लातूर, हिंगोली या जिल्यातील महाविद्यालये |
| ५ | नागपूर | नागपूर, गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर, भंडारा, वर्धा या जिल्यातील महाविद्यालये |
| ६ | अमरावती | अमरावती, अकोला, बुलडाणा, यवतमाळ, वाशिम या जिल्यातील महाविद्यालये |

**४. विभागीय निवड चाचण्यांच्या ठिकाणी पोहचणेसंदर्भात (Reporting for Zonal Trials) :**

महाविद्यालयीन संघासोबत किमान एक संघ व्यवस्थापक असणे आवश्यक आहे. तसेच जर संघात मुलींचा सहभाग असल्यास एक महिला व्यवस्थापक असणे देखील आवश्यक आहे. सदर संघांनी संबंधीत मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नागपुर आणि अमरावती याविभागीय चाचण्यांच्या ठिकाणी खेळाडु विद्यार्थी वेळेत पोहचण्याची जबाबदारी हि स्पर्धेत भाग घेणाऱ्या संबंधित महाविद्यालयांची असेल. तसेच, विभागीय स्पर्धेकरीता आयोजक महाविद्यालयातील स्थानिक समन्वयक व विद्यापीठ नियुक्त संबंधीत महसूल विभागातील विभागीय समन्वयक हे स्पर्धेत सहभागी महाविद्यालयांच्या संघव्यवस्थापकांची **स्पर्धा संपन्न झाल्यानंतर बैठक आयोजित करुन बैठकीचा सविस्तर अहवाल विद्यापीठास तात्काळ ई-मेलद्वारे सादर करतील.**

**५. विभागीय संघाची निवड (Selection of Zonal Team) :**

अ) आंतर विभागीय स्पर्धेमध्ये संबंधित विभागाचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी पुरुष आणि महिला यांचा प्रत्येकी १२ खेळाडूंचा समावेश असलेला विभागीय संघाची निवड केली जाईल. तसेच सहा विभागीय समन्वयकांनी **परिशिष्ट "ब"** सोबत जोडलेल्या नमून्यानुसार विभागीय संघातील निवडक खेळाडूंची नावांची सविस्तर यादी (Nominal Roll) तयार करावी आणि **मा. श्री. आण्णासाहेब डांगे आयुर्वेद महाविद्यालय, आष्टा, जि. सांगली** येथे आंतर विभागीय चाचण्यांसाठी पोहचल्यानंतर **डॉ. सुशांत कणसे (८३०८२२५९६०)** यांच्याकडे सोपवावी.

ब) विभागीय समन्वयक आंतर विभागीय स्पर्धासाठी संघ व्यवस्थापक म्हणून विभागीय संघा सोबत असतील.

क) संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग यांचा सल्ला घेऊन विभागीय क्रीडा समन्वयक बाहेरील ०५ तज्ञ प्रशिक्षक/निवड समिती सदस्य (एक महिला शिक्षिकासह) यांची यादी तयार करतील व सदर यादी **दि. ०६/१०/२०२५** रोजी किंवा त्यापुर्वी विद्यापीठास सादर करतील. त्यानुसार प्रशिक्षक/निवड समिती सदस्य यांची स्पर्धेकरीता निवड करण्यात येईल.

**६. आंतर विभागीय निवड चाचणी (Inter Zonal Selection Trials):**

अ) आंतर विभागीय निवड चाचणी दि.**०९ ते १० ऑक्टोबर २०२५ या कालावधीत** मा. श्री. आण्णासाहेब डांगे आयुर्वेद महाविद्यालय, आष्टा, जि. सांगली येथे संपन्न होणार असून सदर निवड चाचणीतून प्रत्येक खेळासाठी पुरुष आणि महिला संघाकरीता १८ खेळाडूंचा समावेश असलेले विद्यापीठ संघ निवडण्यात येतील.

ब) विभागीय संघांनी, संघ व्यवस्थापक आणि प्रशिक्षकांसह **दि.०८ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजता** आंतर विभागीय निवड चाचणीच्या ठिकाणी (मा. श्री. आण्णासाहेब डांगे आयुर्वेद महाविद्यालय, आष्टा, जि. सांगली) येथे पोहचावे. त्याच बरोबर आयोजक महाविद्यालयातील आंतर विभागीय समन्वयक यांनी **दि.०८ ऑक्टोबर २०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजता** सर्व विभागीय संघ व्यवस्थापक आणि प्रशिक्षक यांची बैठक आयोजित करतील आणि सदर बैठकीचा अहवाल ई-मेलद्वारे विद्यापीठाला पाठवतील.

क) आंतर विभागीय निवड चाचणीसाठी निवड समितीचे सदस्य म्हणून किमान दहा संघ व्यवस्थापक त्यापैकी किमान एक महिला शिक्षिका यांचे विद्यापीठाकडून नामनिर्देशित केली जाईल.

ड) विद्यापीठाने नामनिर्देशित केलेली निवड समिती ही, क्रीडा महोत्सवासाठी संघांची निवड करतील आणि त्यांचा निर्णय अंतिम असेल.

इ) विभागीय समन्वयकाने केलेली प्रवास व्यवस्था सर्व खेळाडू, प्रशिक्षक आणि संघ व्यवस्थापकांसाठी अनिवार्य राहिल व त्यांनी केलेल्या व्यवस्थेला कोणाची हरकत असणार नाही.

फ) सर्व निवड झालेल्या खेळाडूंनी विद्यापीठाचे ओळखपत्रासाठी तीन पासपोर्ट आकाराचे फोटो प्रवेशिकासह (Nominal Roll) सराव शिबीर समन्वयक (Coching Champ Co-ordinator) यांच्याकेडे सुपूर्द करावे.

७. सराव शिबीर आणि क्रीडा महोत्सव (**Coaching Camp & Krida Mahotsav**) :

उक्त नमूद केल्याप्रमाणे " स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ, नांदेड " येथे क्रीडा महोत्सवाचे आयोजन होण्याचे प्रस्तावीत आहे. परंतू, सदर तारखा अंदाजीत असल्याने शासनाकडून निश्चित तारखा प्राप्त झाल्यानंतर सराव शिबीराचे आयाजनाच्या तारखा परीपत्रकाद्वारे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

८. आर्थिक तपशिल (**Financial Aspects**):

क) विभागीय निवड चाचणीत सहभाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा जेवण, उपकरणे, कपडे, स्थानिक प्रवास, तसेच महाविद्यालया पासून ते निवड चाचणीच्या ठिकाणी आणि परत महाविद्यालयापर्यंतचा प्रवास खर्च संबंधीत महाविद्यालय करतील त्याचबरोबर संघ व्यवस्थापक यांचा प्रवास व दैनिक भत्याचा खर्च देखील महाविद्यालयाने करावा याची नोंद घ्यावी.

ख) संबंधित विभागामध्ये विभागीय चाचण्या आयोजित करणाऱ्या महाविद्यालयांनी त्यांच्याकडील उपलब्ध असलेली निवासस्थाने सहभागींसाठी विनामुल्य (मोफत) उपलब्ध करुन द्यावी.

ग) विभागीय स्पर्धा आयोजित करणाऱ्या महाविद्यालयांना विद्यापीठाकडून क्रीडा नियमावलीनुसार खर्चाची रक्कम अग्रीम स्वरुपात देय राहिल.

घ) आंतर विभागीय निवड चाचणीचे आयोजक महाविद्यालय मा. श्री. आण्णासाहेब डांगे आयुर्वेद महाविद्यालय, आष्टा, जि. सांगली हे आंतर विभागीय चाचणीसाठी सहभागी होणाऱ्या खेळाडू विद्यार्थी तसेच संघ व्यवस्थापक व प्रशिक्षक यांची राहण्याची व्यवस्था विनामुल्य उपलब्ध करुन देतील.

छ) क्रीडा महोत्सव कालावधीत विद्यापीठाच्या परीक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांना सहभागी होता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

ज) सर्व क्रीडा स्पर्धेदरम्यान शिस्तीचे पालन करण्यात यावे. याबाबत कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन आढळून आल्यास त्याबाबत कडक कार्यवाही करण्यात येईल.

झ) सर्वांना सुचित करण्यात येते की, विद्यापीठाने दिलेल्या सुचनांचे योग्य पालन करावे आणि स्पर्धेदरम्यान सहकार्य करावे.

ट) विद्यापीठ सलग्नीत महाविद्यालयातील सर्व अधिष्ठाता/प्राचार्य यांनी या परीपत्रकास व्यापक प्रसिध्दी देवून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना सहभाग घेण्यासाठी प्रोत्साहित करावे.

कळावे,

Maharashtra University of Health Sciences MUHS Nashik

17-9-25

कुलसचिव

कुलसचिव
महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ
नाशिक

प्रत :

१) मा. कुलगुरु कार्यालय, मआविवि नाशिक

२) मा. प्रति कुलगुरु कार्यालय, मआविवि नाशिक

३) मा. कुलसचिव कार्यालय, मआविवि नाशिक

४) मा. वित्त व लेखा अधिकारी मआविवि नाशिक

५) सर्व विभागीय कार्यालय, मआविवि नाशिक

MUHS

Annexure § "A"

# Maharashtra University of Health Sciences, Nashik

## NOMINAL ROLL OF THE PLAYERS FOR ZONAL TEAM

१) Name of the College :...........................................................................

२) Name of the Team Manager :........................................................................... e-mail____________________
Mob. No____________________

३) Name of the Lady Team Manager :........................................................................... e-mail____________________
Mob. No____________________

| Sr. No | Full Name | Name of College | Mobile No. | E-mail Id | Father's Name | Mother's Name | Date of Birth | Date & Year of passing class XII exam | Date of First year Admission | Present Course | Present Class | Duration of the Course | Date & Year of First Admission in | | Remark |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | University | Present Course | |
| १ | | | | | | | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | | | | | | | | |

१) Certified that the above individuals are full time students of this college.

२) Above information given is true.

३) Fill up all information in Capital Letters

Date :.....................

Place :.....................

Seal of the College

Signature & Name of Dean / Principal

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

MUHS

दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४ Diṇdori Road, Mhasrul, Nashik – 422004
**Tel** : (0253) 2539169/174 ☎ **Student Helpline** : 0253-2539111/6659111
**Website**: www.muhs.ac.in, **E-mail**: sw@muhs.ac.in

**डॉ. देवेंद्र शेषराव पाटील**
एम.डी.(होमिओपॅथी)
**संचालक, विद्यार्थी कल्याण**

Dr. Devendra Sheshrao Patil
M.D. (Homoeopathy)
Director, Student Welfare


जा.क्र.: मआविवि/वि.क./१३६३ /२०२५ दि. २५ /०८/२०२५

प्रति,
मा.अधिष्ठाता/प्राचार्य
विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालय,
मआविवि, नाशिक

**विषय :** दि. २९ ऑगस्ट २०२५ रोजी आयोजित राष्ट्रीय क्रीडा दिवशी महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी तसेच शिक्षकांमध्ये क्रीडा व शारीरिक कवायतीसाठी किमान १ तास कार्यशाळा आयोजित करणेबाबत.....

**संदर्भ :** विश्वविद्यालय अनुदान आयोग यांचेकडिल पत्र क्र.डीओ नं.८-१/२०२४ (संकीर्ण), २९ श्रवण १९४७, दिनांक २० ऑगस्ट २०२५.

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये कळविण्यात येते की, राष्ट्रीय क्रीडा दिवस २९ ऑगस्ट २०२५ रोजी साजरा केला जाणार आहे. केंद्रीय मंत्रालयातील धोरणानुसार सर्व विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांनी विद्यार्थी तसेच शिक्षकांसाठी दिनांक २९ ऑगस्ट २०२५ या कालावधीत क्रीडा स्पर्धेचे व शारिरीक कवायतींचे किमान एक तासाचे आयोजन करावे, जेणेकरुन विद्यार्थी तसेच शिक्षकांमध्ये शारीरिक स्वास्थ्याप्रती जागृती होईल.

तसेच दिनांक २९ ते ३१ ऑगस्ट २०२५ या दरम्यान आपल्या महाविद्यालयांमध्ये विश्वविद्यालय अनुदान आयोग यांनी दिलेल्या नियमानुसार विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे. सदर कार्यशाळा आयोजित करण्यासाठी विश्वविद्यालय अनुदान आयोगाने दिलेल्या नियमावली प्रमाणे महाविद्यालयातील सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांना उक्त कार्यक्रमासाठी प्रोत्साहित करुन शारिरीक स्वास्थ्यासाठी जनजागृती करण्यात यावी. उक्त संदर्भीय पत्रान्वये प्राप्त झालेले कार्यक्रम/उपक्रमाचे स्वरुप आपणास अग्रेषित करण्यात येत आहे.

25/8/25

संचालक,
विद्यार्थी कल्याण

सोबत :- संदर्भाधिन पत्र व नियमावली.

C:\Users\sw९\Desktop\Desk - ४\College Letters\Sports Day Activity Letter.doc

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK

दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक – ४२२००४, Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004

Tel:(0253 2539170/169/6659170/169 ☎ Student Helpline: 0253- 9111/6659111/100

Website: www.muhs.ac.in, E-mail: sw@muhs.ac.in

MUHS

**डॉ. देवेंद्र शेषराव पाटील**
एम.डी.(होमिओपॅथी)
**संचालक, विद्यार्थी कल्याण**

**Dr. Devendra Sheshrao Patil**
M.D. (Homoeopathy)
**Director, Student Welfare**

**मआविवि/एसडब्ल्यू/स्किम/9800 /२०२५** **दि. 07/0C/२०२५**

**"परिपत्रक क्र. २५ /२०२५"**

**प्रति,**

**मा. अधिष्ठाता/प्राचार्य**
**सर्व संलग्नित महाविद्यालये,**
**म. आ. वि. वि. नाशिक.**

**विषय :-** संजीवनी विद्यार्थी सुरक्षा योजनेबाबत...

**संदर्भ :-** १. विद्यापीठ परिपत्रक क्र.१२/२०२१, दि. ०१/०७/२०२१
२. व्यवस्थापन परिषदेचा ठराव क्र.१६८/२०२१, दि.२४/१२/२०२१
३. व्यवस्थापन परिषदेचा ठराव क्र.४८२/२०२५, दि.२९/०५/२०२५

**महोदय/ महोदया,**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासासाठी विद्यापीठाच्या विविध उपक्रमांच्या माध्यमातुन सतत प्रयत्न केले जात असतात. आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाचा विद्यार्थी मुळातच हुशार समजला जातो. मात्र आर्थिक किंवा सामाजिक अडचणीमुळे त्याला उच्च शिक्षणात अडचणी येवु नयेत यासाठी विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागामार्फत विद्यार्थ्यांच्या हितासाठी विविध कल्याणकारी योजना सुरु केलेल्या आहेत.

विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयात नियमित शिक्षण घेत असताना विद्यार्थ्याला गंभीर आजार झाल्यास/दुदैवाने त्याला काही अपघात झाल्यास/अपघातामुळे इजा झाल्यास किंवा दुदैवाने अपमृत्यु झाल्यास होणाऱ्या हानीची अंशतः का होईना भरपाई व्हावी या हेतुने संजीवनी विद्यार्थी सुरक्षा योजना सुरु करण्यात आली आहे. या योजने अंतर्गत विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये व शैक्षणिक संस्थामधील पदवी, पदविका व पदव्युत्तर स्तरावरील शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना ही योजना लागु करण्यात आली आहे.

अधिष्ठाता/प्राचार्य यांनी सदर योजना महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यापर्यत पोहोचवयाची आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता संजीवनी विद्यार्थी सुरक्षा योजनेकरीता विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयामार्फत सदर योजनेत नमूद केलेले गंभीर आजार/अपघात/विद्यार्थी मृत्युमुखी पडल्यास अशी परिस्थिती उद्‌भविल्यास प्रस्ताव हार्डकॉपी व ऑनलाईन पध्दतीने पाठविण्यात यावे. सदर योजनांची नियमावली या परिपत्रकासोबत जोडून पाठवित आहोत.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासुन विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थी किंवा विद्यार्थीनीचा कमावता पालक (वडील किंवा वडीलांचा मृत्यु झालेला असल्यास आई किंवा आई - वडील दोघांचा मृत्यु झालेला असल्यास सांभाळ करणारा पालक) यांचा

मृत्यु झाल्यास अशा विद्यार्थ्यास खालील अटी व शर्तीचे आधीन राहुन एकवेळेची बाब म्हणुन एकरक्कमी रु. २,००,०००/- (रु. दोन लक्ष मात्र) चे अर्थसहाय्य विद्यापीठातर्फे देण्यात येईल.

असाध्य (उदा. हृदयविकाराचा झटका, हृदयउपमार्ग शस्त्रक्रिया, अन्जिओप्लास्टी शस्त्रक्रिया, मूत्रपिंड किंवा इतर अवयव प्रतिरोपण शस्त्रक्रिया, कोणत्याही अवयवाचा कर्करोग, मेंदूविकार, पक्षघात इ.) आजाराच्या उपचारासाठी विद्यार्थ्याने महाविद्यालयाकडे सादर केलेल्या उपचारासाठी हॉस्पीटल कडून घेतलेल्या दरपत्रकाच्या आधारे रु.५०,०००/- अग्रीम देण्यात येईल व विद्यार्थ्याच्या आजाराच्या उपचारानंतर महाविद्यालयाने हॉस्पिटलच्या उपचाराचे मूळदेयक संजीवनी विद्यार्थी सुरक्षा योजना नियमावलीतील नियम क्रं. ६.१७ मधील लागु असलेल्या उपनियमाप्रमाणे सादर केल्यानंतर रु. ५०,०००/- देण्यात येतील असे विद्यार्थ्यास असाध्य आजारासाठी उपचारा करीता एकुण रु. १,००,०००/- (रु.एक लक्ष) किंवा प्रत्यक्ष झालेला खर्च यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम देण्यात येईल.

सदर योजने अंतर्गत विद्यार्थी/विद्यार्थ्याच्या वारसदारांना देण्यात येणारी अर्थसहायत्ता विद्यापीठाच्या अनुदानातुन देण्यात येणार असल्याने योजनेचा लाभ विद्यार्थी/विद्यार्थ्याच्या वारसदारांना मिळणारी सवलत आहे, त्यांचा हक्क नाही. संजीवनी विद्यार्थी सुरक्षा योजनेच्या अटी व शर्तीबाबत निर्णय घेण्याचे तसेच त्यात बदल करण्याचे सर्व हक्क विद्यापीठाकडे राखुन ठेवण्यात आले आहेत. योजनाबाबतचा तपशिल विद्यापीठाच्या **www.muhs.ac.in** या संकेतस्थळावर Department → Student Welfare→ Circular 2025-26 उपलब्ध आहे.

**शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासुन महाविद्यालयाने खालील नमुद केलेल्या सुचना प्रमाणे ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावयाचा आहे. सद्यस्थितीत विद्यार्थ्यांने/पालक यांनी हार्ड कॉपी मध्ये अर्ज भरुन महाविद्यालयाकडे जमा करावा व महाविद्यालयाच्या प्रतिनिधीने विद्यार्थ्याच्या अथवा पालकांच्या अर्जाची छाननी करुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावयाचा आहे तसेच विद्यार्थ्यांने अथवा पालकांनी भरुन दिलेल्या अर्जाची ऑनलाईन कॉपी देखील विद्यापीठाकडे सादर करावायाची आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याची कार्यपध्दती खाली नमुद केलेली आहे.**

सदर सुधारणा याद्वारे प्रख्यापित करण्यात येत असुन, उक्त बाब सर्व संबंधितांच्या माहितीस्तव कळविण्यात येत आहे.

**संचालक**
**विद्यार्थी कल्याण**

**प्रत माहितीस्तव :**
**१) मा. कुलगुरु कार्यालय, मआविवि, नाशिक**
**२) मा. कुलसचिव कार्यालय, मआविवि, नाशिक**
**३) मा. वित्त व लेखा अधिकारी, मआविवि, नाशिक**
**४) सर्व विभाग प्रमुख, मआविवि, नाशिक**

**सोबत :**
**१) विद्यार्थी सुरक्षा योजनेची सुधारीत नियमावली**
**२) दावा संजीवनी अर्ज (क्लेम फॉर्म)**
**३) वैद्यकीय प्रमाणपत्राचा नमुना**

**टिप :**
**१) वर नमुद योजनेची सविस्तर माहिती, नियमावली, विविध अर्ज व नमुने विद्यापीठाच्या www.muhs.ac.in या संकेतस्थळावर Department → Student Welfare→ Circular 2025-26 उपलब्ध आहे.**

२) **महाविद्यालयाने ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावयाची प्रक्रिया**

**Step 1 —** कॉलेजने खालील लिंकव्दारे ऑन-बोर्डींग प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे तसेच सिस्टीम मध्ये क्रेडेन्शियल्स प्राप्त करणे गरजेचे आहे.
अर्ज करण्यासाठी लिंक **https://automation.muhs.ac.in/**

**Step 2 —** कॉलेजने ऑन-बोर्डीग पूर्ण झाल्यानंतर विद्यमान विद्यार्थ्यांचा डेटा तपासणे आणि प्रमाणित करणे आवश्यक आहे. ज्या विद्यार्थ्यांनी योजनांसाठी अर्ज केले आहेत ते आधी तपासणी करुन नंतर उर्वरीत विद्यार्थ्यांची पडताळणी करणे चालेल. एकतर विद्यार्थी रेकॉर्ड सिस्टममध्ये अस्तित्वात असेल किंवा अस्तिवात नसेल.

१) जर विद्यार्थ्यांचे रेकॉर्ड अस्तित्वात असल्यास – तपशील ऑनलाईन उपलब्ध दिसत असतील तर College Desk व्दारे सर्व संबधीत तपशील अद्ययावत करा.

२) जर विद्यार्थ्यांचे रेकॉर्ड्स अस्तित्वात नसल्यास – तपशील ऑनलाईन उपलब्ध दिसत नसतील तर College Desk वापरुन विद्यार्थ्यांचे रेकॉर्ड नव्याने भरा.

**Step 3 —** योजनेचे अर्ज विद्यार्थ्यांकडून कॉलेजने ऑफलाईन पध्दतीने (Hard Copy) मध्ये घ्यावेत.

१) कॉलेजने ऑनलाईन प्रणालीमध्ये प्रणालीमध्ये अशाच विद्यार्थ्यांचे अर्ज प्रविष्ट करावेत ज्या विद्यार्थ्याने हार्ड कॉपीमध्ये अर्ज केला आहे व ऑफलाईन आलेल्या अर्जाची कॉलेजच्या स्तरावर छाननीनंतर कॉलेजने MUHS कडे ऑनलाईन अर्ज सादर करावेत.

**टिप - ऑनलाईन अर्ज सादर करताना काही तांत्रिक समस्या असल्यास कृपया कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत खालील क्रमांकावर संपर्क साधावा:**
८०८७९९५८८३, ९९६०६९७८८३
**(सी-डॅकसंस्थेचेप्रतिनिधी)मेलआयडी–muhs.application.helpdesk@gmail.com**

३) **महाविद्यालयाने प्रस्ताव सादर करतांना तपासणी सूची (सहपत्र "ब") प्रमाणे दस्तावेज तपासुन अनुक्रमाप्रमाणे पृष्ठांकीत करुन सादर करावेत.**

# - संजीवनी विद्यार्थी सुरक्षा योजना नियमावली -

(६.१) विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयात नियमित शिक्षण घेत असतांना विद्यार्थ्याला काही गंभीर झाल्यास, त्याचा अपघात झाल्यास, अपघातामुळे अपंगत्व आल्यास किंवा अपघात किंवा आजारामुळे अपमृत्यू झाल्यास किंवा कोणत्याही कारणाने मृत्यु झाल्यास त्याच्या कुटुंबियांच्या होणाऱ्या हानीची अंशतः का होईना भरपाई व्हावी हा सदर योजनेचा उद्देश असून योजनेचे नियम याव्दारे विहित करण्यात आलेले आहेत.

(६.२) सदर योजनेअंतर्गत विद्यार्थी किंवा विद्यार्थ्याच्या मृत्युप्रकरणी त्याच्या पालकांना किंवा वारसदारांना देण्यात येणारे अर्थसहाय्य अनुदान विद्यापीठाच्या स्वनिधीतून देण्यात येईल.

(६.३) सदर योजना विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व महाविद्यालयातील पदवी, पदविका, आंतरवासियता (Internship) प्रशिक्षणार्थी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या स्तरावरील नियमित शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना लागू असेल.

(६.४) विद्यापीठांतर्गत नियमित स्वरुपात विद्यार्थ्याचा प्रवेश घेतल्याचे दिनांकापासुन ते संबधीत विद्यार्थ्याचा अभासक्रम पुर्ण होईपावेतोच्या दिवसापर्यंत सदर योजनेचा लाभ अनुज्ञेय असेल.

(६.५) **विद्यार्थ्याचा अपघातामुळे, नैसर्गिक आपत्तीमुळे** (उदा. पूर, भूकंप, आग, वीज पडून इ.), ह्रदय विकाराच्या झटक्याने किंवा गंभीर आजाराने आकस्मित मृत्यु झाल्यास किंवा इतर कोणत्याही कारणाने मृत्यु झाल्यास रु.२,००,०००/- (रुपये दोन लक्ष मात्र) इतकी रक्कम विद्यार्थ्याच्या / वारसदारांना अर्थसहाय्य अनुज्ञेय असेल.

(६.६) **विद्यार्थ्याचा अपघातामध्ये** कायम स्वरुपी एक हात किंवा एका पायाला अपंगत्व आल्यास किंवा एका डोळयाची कायमस्वरुपी दृष्टी गेल्यास रु.१,००,०००/- अथवा यापैकी कोणत्याही दोन अवयवांना कायमस्वरुपी अपंगत्व आल्यास रु.२,००,०००/- इतके अर्थसहाय्य जिल्हा शल्यचिकीत्सकाचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतर अनुज्ञेय असेल.

(६.७) **विद्यार्थ्याचा अपघात झाल्यास** दुखापतग्रस्त अवयवावर मोठी शस्त्रक्रीया करावी लागली असल्यास (उदा. मेंदू, ह्रदय, यकृत, फुप्फुस इ.अवयवांवरील शस्त्रक्रीया) उपचारासाठी प्रत्यक्ष झालेल्या खर्चाची रक्कम किंवा रु. ५०,०००/- (रुपये पन्नास हजार मात्र) यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम खर्चाची प्रतीपुर्तीची देयके प्रस्तावासोबत सादर केल्यानंतर अर्थसहाय्य अनुज्ञेय असेल.

(६.८) **विद्यार्थ्यास गंभीर आजार झाल्यास** (उदा. ह्रदयविकाराचा झटका, ह्रदयउपमार्ग शस्त्रक्रिया, अन्जिओप्लास्टी शस्त्रक्रिया, मूत्रपिंड किंवा इतर अवयव प्रतिरोपण शस्त्रक्रिया, कोणत्याही अवयवाचा कर्करोग, मेंदूविकार, पक्षघात इ.) अशा आजाराच्या उपचाराकरीता प्रत्यक्ष झालेल्या खर्चाची रक्कम किंवा रु. ५०,०००/- (रुपये पन्नास हजार मात्र) यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम खर्चाची प्रतिपूर्ती देयके प्रस्तावासोबत सादर केल्यानंतर अर्थसहाय्य म्हणून अनुज्ञेय असेल.

(६.९) **विद्यार्थ्याचे अपघातात** शरीराचे कुठलेही हाड मोडले असल्यामुळे शस्त्रक्रीया करावी लागली असल्यास किंवा अपघातानंतर कुठल्याही प्रकारची शस्त्रक्रीया करावी लागली असल्यास किंवा आजारामुळे छोटी शस्त्रक्रिया करावी लागल्यास होणाऱ्या खर्चाइतकी किंवा जास्तीत जास्त रु. २०,०००/- (रुपये वीस हजार मात्र) इतक्या खर्चाची रक्कम प्रतिपुर्तीची देयके प्रस्तावासोबत सादर केल्यानंतर अर्थसहाय्य म्हणून अनुज्ञेय असेल. अपघातात विद्यार्थीचे हाड मोडल्यामुळे/इजा झाल्यामुळे/दुखापत झाल्यामुळे हॉस्पिटलमध्ये काही तासांसाठी उपचार घेणेसाठी दाखल झालेला असल्यास प्रत्यक्ष झालेला खर्च किंवा रु.१०,००० यापैकी कमी असलेली रक्कम अनुज्ञेय असेल.

(६.१०) **विद्यार्थ्याचे मुत्रपिंड निकामी झाले असल्यास** त्याकरीता एखादया विद्यार्थ्यास डायलिसीस करावे लागत असल्यास एका महिन्यातून कमाल चार वेळा डायलीसीस करण्याकरीता प्रती डायलीसीस जास्तीत जास्त रु. २,०००/- ईतके अर्थसहाय्य खर्चाची देयके सादर केल्यानंतर अर्थसहाय्य म्हणून अनुज्ञेय असेल.

**संजीवनी विद्यार्थी सुरक्षा योजना**

**(६.११) नुकसानीचे स्वरुप व त्याकरीता निर्धारित अर्थसहाय्याची रक्कम दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे:**

| अ.क्र. | नुकसानीचे स्वरुप | भरपाई / अर्थसहाय्याची रक्कम |
|---|---|---|
| १ | विद्यार्थ्याचा अपघाताने / नैसर्गिक आपत्तीने / गंभीर आजाराने किंवा इतर कोणत्याही कारणाने मृत्यु झाल्यास | रु.२,००,००० |
| २ | कायम स्वरुपी अपंगत्व (दोन्ही डोळयांची पूर्णतः दृष्टी जाणे / दोन अवयवांना/ कायमस्वरुपी अपंगत्व ) | रु.२,००,००० |
| ३ | कायम स्वरुपी एका अवयवाला पूर्णतः अपंगत्व (एका डोळयाची दृष्टी जाणे किंवा एका अवयवाला अपंगत्व) | रु.१,००,००० |
| ४ | **अपघात झाल्यास मोठी शस्त्रक्रिया करावी लागली असल्यास** (उदा.मेंदू, हृदय, यकृत, फुप्फुस इ. किंवा इतर अवयवांवरील मोठी शस्त्रक्रीया) | प्रत्यक्ष झालेला खर्च किंवा रु.५०,००० यापैकी कमी असलेली रक्कम |
| ५ | **विद्यार्थ्यास गंभीर आजाराचे उपचाराकरीता** (उदा. हृदयविकाराचा झटका, हृदयउपमार्ग शस्त्रक्रिया, ॲन्जिओप्लास्टी शस्त्रक्रिया, मूत्रपिंड व इतर अवयव प्रतिरोपण शस्त्रक्रिया, कोणत्याही अवयवाचा कर्करोग, मेंदूविकार, पक्षाघात इ.) | प्रत्यक्ष झालेला खर्च किंवा रु.५०,००० यापैकी कमी असलेली रक्कम |
| ६ | किरकोळ अपघातात विद्यार्थ्याचे हाड मोडले असल्यामुळे शस्त्रक्रीया करावी लागली असल्यास किंवा अपघातानंतर इतर कारणामुळे शस्त्रक्रीया करावी लागली असल्यास किंवा आजारामूळे छोटी शस्त्रक्रिया करावी लागल्यास | प्रत्यक्ष झालेला खर्च किंवा रु.२०,००० यापैकी कमी असलेली रक्कम |
| ७ | अपघातात विद्यार्थीचे हाड मोडल्यामुळे/इजा झाल्यामुळे/दुखापत झाल्यामुळे हॉस्पिटलमध्ये काही तासांसाठी उपचार घेणेसाठी दाखल झालेला असल्यास प्रत्यक्ष झालेला खर्च किंवा रु.१०,००० यापैकी कमी असलेली रक्कम | प्रत्यक्ष झालेला खर्च किंवा रु.१०,००० यापैकी कमी असलेली रक्कम |
| ८ | मुत्रपिंड निकामी झाल्यामुळे डायलीसील करावे लागत असल्यास | एका महिन्यातून कमाल चार वेळा डायलीसीस - प्रत्येक डायलीसीस करीता रु. २,०००/- |

(६.१२) उपरोक्त मुददयांमध्ये नमूद केलेल्या व्यतिरिक्त अपघातामध्ये शरीराचा इतर कुठलाही अवयव निकामी झाल्यास किंवा अपंगत्व आले असल्यास अशा प्रस्तावांसाठी विद्यापीठाने या योजनेच्या अंमलबजावणीचे प्रयोजनाकरीता गठीत केलेल्या समितीने घेतलेल्या निर्णयानुसार अर्थसहाय्याची रक्कम अनुज्ञेय असेल.

(६.१३) विद्यार्थ्याचा अपघात झाल्यास, किंवा इतर कोणत्याही कारणाने मृत्यु झाल्यास किंवा विद्यार्थ्याच्या गंभीर आजाराविषयी महाविद्यालयाला कळविण्यात आले असेल तर महाविद्यालयाने

प्रथम स्तरावर १० दिवसाच्या आत टपालाद्वारे किंवा ई-मेलद्वारे विद्यापीठास त्याबाबत कळविणे आवश्यक असेल.

(६.१४) महाविद्यालयाने / शैक्षणिक संस्थेने त्यांच्या स्तरावर विद्यार्थ्यांसाठी दुसरी एखादी विमा योजना लागु केली असल्यास त्याचा या योजनेशी संबंध राहणार नाही. या योजनेअंतर्गत मिळणारे अर्थसहाय्य ही स्वतंत्र बाब असेल.

(६.१५) विद्यापीठाने कोणत्याही विमा कंपनीशी करार न करता दि.२९/०३/२०१२ पासुन सदर योजना विद्यापीठामार्फत राबविण्यात येत असल्याने या तारखेनंतर विद्यापीठाअंतर्गत विद्यार्थ्यांचा अपघात किंवा इतर कोणत्याही कारणाने मृत्यु झाल्यास किंवा गंभीर आजाराचा उपचार घेत असल्यास अशा विद्यार्थ्यांचे प्रस्ताव विद्यापीठाने या योजनेच्या अंमलबजावणीचे प्रयोजनाकरीता गठित केलेल्या समितीच्या सदस्यांनी घेतलेल्या निर्णयानुसार निकाली काढण्यात येतील.

(६.१६) सदर योजनेअंतर्गत प्राप्त अर्थसहाय्याचा प्रस्ताव विद्यापीठास प्राप्त झाल्यानंतर शक्यतो १५ दिवसांचे आत अशा प्रस्तावांची विद्यापीठाच्या प्रशासकीय स्तरावर छानन‍ी करण्यात येईल. छाननी दरम्यान प्रस्तावात काही अपुर्तता किंवा त्रूटी असल्यास सदर बाबींची पूर्तता करणेकरीता संबंधितांस किंवा संबंधीत महाविद्यालयास प्रशासकीय स्तरावरुन कळविण्यात येईल. प्रशासकीय स्तरावर प्रस्ताव परिपूर्ण आढळून आल्यास असा प्रस्ताव उक्त योजनेच्या अंमलबजावणीचे प्रयोजनाकरीता खालीलप्रमाणे गठीत केलेल्या समितीसमोर सादर करण्यात येईल. सदर समितीने घेतलेला निर्णय अंतिम व बंधनकारक असेल.

**संजीवनी विद्यार्थी सुरक्षा योजना अंमलबजावणी समिती**

| | | |
|---|---|---|
| १ | मा. कुलगुरु | अध्यक्ष |
| २ | मा. प्रति कुलगुरु | सदस्य |
| ३ | कुलसचिव | सदस्य |
| ४ | वित्त व लेखा अधिकारी | सदस्य |
| ५ | विधी अधिकारी | सदस्य |
| ६ | संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग | सदस्य सचिव |

(६.१७) विद्यार्थ्यांचा कोणत्याही कारणाने मृत्यु झाला असल्यास किंवा अपघातात कायमचे अपंगत्व आल्यास किंवा अपघाताच्या उपचारासाठी किंवा गंभीर आजाराच्या उपचारासाठी किंवा अपघातात हाड मोडले असेल किंवा शस्त्रक्रिया करावी लागली असल्यास किंवा डायलीसीसकरीता सदर योजनेअंतर्गत अर्थसहाय्याचा प्रस्ताव व **प्रस्तावासोबत खालीलप्रमाणे दस्ताऐवज तसेच ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक असेल.**

(I) मृत विद्यार्थ्यांच्या पालकांनी त्यांचा पाल्य ज्या महाविद्यालयात शिक्षण घेत असेल त्या महाविद्यालयाचे अधिष्ठाता/प्राचार्य यांचे मार्फत **ऑनलाईन पध्दतीने** अर्ज सादर करावा. तसेच अपघातग्रस्त, गंभीर आजारी, शस्त्रक्रिया झालेल्या किंवा मुत्रपिंड निकामी झालेल्या विद्यार्थ्याने तो ज्या महाविद्यालयात शिक्षण घेत असेल त्या महाविद्यालयाचे अधिष्ठाता/प्राचार्य यांचे मार्फत अर्ज सादर करावा.

(II) वैद्यकीय प्रमाणपत्र (नमुना अर्ज) मधील सर्व रकान्यांमध्ये मृत/ अपघातग्रस्त/ अपघातामुळे कायमस्वरुपीचे अपंगत्व आलेल्या/ शस्त्रक्रिया झालेल्या/ मुत्रपिंड निकाम ी झालेल्या विद्यार्थ्यांची पुर्ण माहिती भरणे आवश्यक असेल. तसेच, त्यावर वैद्यकीय अधिकाऱ्याचा योग्य ठिकाणी स्वाक्षरी व शिक्का, पत्ता व दूरध्वनी क्रमांक नमूद असावा.

(III) **विद्यार्थ्याचा अपघातात मृत्यु झाला असेल** तर अ) एफ.आय.आर. व पोलिस पंचनामा, पोलिस पंचनामा यांची साक्षांकित प्रत. तसेच, जिल्हा शल्य चिकीत्सकाचा अथवा शासकीय वैद्यकीय अधिकारी यांनी दिलेला शवविच्छेदन अहवाल किंवा मृत्यु प्रमाणपत्राची मुळ प्रत.

(IV) **विद्यार्थ्याचा अपघात झाला असल्यास** एफ.आय.आर व पोलीस पंचनाम्याची साक्षांकीत प्रत.

(V) **विद्यार्थी आजाराने किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे किंवा इतर कोणत्याही कारणाने मृत पावला असेल** तर नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकाचे प्रमाणपत्र आवश्यक असेल. सदर प्रमाणपत्रामध्ये विद्यार्थी केव्हापासून कोणत्या आजाराने आजारी होता किंवा कोणत्या नैसर्गिक आपत्तीमुळे मृत झाला याचा स्पष्ट उल्लेख असणे आवश्यक आहे. तसेच, जिल्हा शल्य चिकीत्सकाचा अथवा शासकीय वैद्यकीय अधिकारी यांनी दिलेला शवविच्छेदन अहवाल किंवा मृत्यु प्रमाणपत्राची मुळ प्रत.

(VI) **अपघातामुळे कायमस्वरुपीचे अपंगत्व आले असल्यास** जिल्हा शल्य चिकीत्सकांनी/ यथोचित समितीने दिलेले अपंगत्व प्रमाणपत्र (अपंगत्व कोणत्या कारणान` आले व शरीराचे कोणते अवयव किती टक्के निकामी झाले याचा स्पष्ट उल्लेख असावा) तसेच, अपंगत्व आलेल्या विद्यार्थ्याचे ४×६ सें.मी. आकाराचे दोन रंगीत छायाचित्रे. (छायाचित्रामध्ये शरीराचे कोणते अवयव निकामी होऊन अपंगत्व आले त्या भागाचे दर्शनी छायाचित्र सादर करावे.)

(VII) **अपघातग्रस्त/गंभीर आजारी/शस्त्रक्रिया झालेल्या विद्यार्थ्यास** रुग्णालयातून सोडल्याचा (Discharge Card) वैद्यकीय अधिकाऱ्याची स्वाक्षरी व शिक्क्यासह दाखला. उपचारासाठी कराव्या लागलेल्या विविध चाचण्यांचे अहवाल व देयके (Investigation Reports & Bills), वैद्यकीय देयके, औषधालयाची देयके, तपासणी अहवाल क्रमवार लावून सादर करावेत.

(VIII) उक्त कागदपत्रांची एकत्रितरीत्या पुर्तता करुन, सदर कागदपत्रे संबंधीत महाविद्यालयाच्या अधिष्ठाता/प्राचार्य यांनी साक्षांकीत करुन विद्यार्थ्याचा कोणत्याही कारणाने मृत्यु झाल्यापासून/ उपचारानंतर रुग्णालयातून डिसचार्ज केल्यानंतर तीन महिन्याच्या आत प्रस्ताव विद्यापीठाकडे सादर करावा.

(६.१८) अपघाताच्या कारणास्तव/ आजारावरील उपचारासाठी रुग्णालयात दाखल केल्यानंतर रुग्णालयातील **स्वतंत्र खोलीचे भाडे** (Private or Semi – Private Room) **, रुग्णवाहिकेचे भाडे, विशेष आहार, टॉनिक, डिसचार्ज नंतरच्या औषधांची देयके इ.** देयके सदर योजनेंतर्गत अर्थसहाय्य देण्यासाठी गृहीत धरले जाणार नाहीत.

(६.१९) प्रस्तावामध्ये विद्यार्थ्याचा मृत्यु झाला असल्यास त्याच्या पालकाचे/वारसदाराचे अथवा इतर सर्व प्रकरणी विद्यार्थ्याचे ज्या बँकेत खाते असेल त्या बँकेचे नाव, खाते क्रमांक, आय.एफ.एस.सीकोड, बँकेची शाखा, बँकेचा पूर्ण पत्ता नमूद करणे अनिवार्य असेल जेणे करुन दावाधारक पालक / वारसदार अथवा विद्यार्थ्याच्या बँक खात्यामध्ये सदर योजनेंतर्गत अर्थसहाय्याची रक्कम ईलेक्ट्रॉनीक ट्रान्सफरद्वारे (आर.टी.जी.एस) जमा करणे सोईचे होईल.

(६.२०) योजनेत खालील बाबींचा समावेश असणार नाही :-

(I) महाविद्यालयात प्रवेश घेण्यापूर्वीचे आजार किंवा अपंगत्व ;

(II) भ्रमिष्टपणा ;

(III) अंमली पदार्थाच्या अंमलाखाली असतांना झालेला अपघात / मृत्यु ;

(IV) गुन्हयाच्या उद्देशाने कायदयाचे उल्लंघन करतांना झालेली दुखापत / अपघात / मृत्यु ;

(V) विद्यार्थ्याचा बेकायदेशीर कृत्यामध्ये असलेल्या सहभागामुळे झालेली दुखापत/अपघात मृत्यु ;

(VI) महाविद्यालयाच्या नियमानुसार बेशिस्त वर्तनामुळे / बेकायदेशीर आंदोलनामध्ये सहभागामुळे झालेली दुखापत / अपघात / मृत्यु ;

(VII) शर्यती व साहसी खेळ या दरम्यान झालेली दुखापत / अपघात / मृत्यु ;

(६.२१) योजनेच्या अनुषंगाने प्रस्तावासोबत आवश्यक असणारी कागदपत्रे सादर करण्याची जबाबदारी विद्यार्थ्याची, विद्यार्थ्याच्या पालकाची तसेच अधिष्ठाता/ प्राचार्य यांची असेल. एखादया कागदपत्राच्या पुर्ततेअभावी प्रस्ताव अपात्र ठरविल्यास त्यासाठी विद्यापीठ जबाबदार नसेल.

(६.२२) विद्यापीठामार्फत दरवर्षी करण्यात येणाऱ्या आर्थिक तरतुदीच्या अधिन राहुन संजीवनी विद्यार्थी सुरक्षा योजनेअंतर्गत प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांनूसार अर्थसहाय्याच्या रक्कमेत बदल करण्याचा अधिकार विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेस अधिकार असेल.

(६.२३) ज्या विद्यार्थ्याचा वैयक्तिक आरोग्य विमा असेल व सदर विम्याअंतर्गत तो विद्यार्थी त्याच्या आजाराच्या किंवा अपघाताच्या उपचारावर झालेल्या खर्चाची प्रतिपुर्ती घेणार असेल किंवा अपघाताच्या उपचारावर झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती घेणार असेल किंवा घेतली असेल अशा विद्यार्थ्यास सदर योजने अंतर्गत अर्थसहाय्य अनुज्ञेय नसेल.

(६.२४) सदर योजना कुठल्याही स्तरावर बंद करुन विद्यार्थी सुरक्षेकरीता इतर योजनेचा अवलंब करण्याचा / विमा काढण्याचा विद्यापीठास अधिकार असेल.

(६.२५) **विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थी किंवा विद्यार्थीनीचा कमावता पालक (वडील किंवा वडीलांचा मृत्यु झालेला असल्यास आई किंवा आई - वडील दोघांचा मृत्यु झालेला असल्यास सांभाळ करणारा पालक) यांचा मृत्यु झाल्यास अशा विद्यार्थ्यास खालील अटी व शर्तीचे आधीन राहुन एकवेळेची बाब म्हणुन एकरक्कमी रु. २,००,०००/- (रु. दोन लक्ष मात्र) चे अर्थसहाय्य विद्यापीठातर्फे देण्यात येईल.**

(I) सदर अर्थसहाय्य केवळ नियमित विद्यार्थी /विद्यार्थीनीस अनुज्ञेय असेल. अभ्यासक्रम अर्धवट सोडलेल्या किंवा ज्या विद्यार्थी /विद्यार्थीनीने विद्यापीठाच्या मागील सलग चार परिक्षा दिलेल्या नसतील त्यांना सदर योजनेअंतर्गत अर्थसहाय्य अनुज्ञेय नसेल.

(II) सदर योजनेअंतर्गत कुठल्याही विद्यार्थी /विद्यार्थीनीस त्यांच्या संपुर्ण शैक्षणिक कारकीर्दीत एकदाच अर्थसहाय्य अनुज्ञेय असेल.

(III) विद्यापीठाअंतर्गत प्रवेश घेण्यापूर्वी पालकांचा मृत्यु झाला असल्यास विद्यार्थी / विद्यार्थीनी अनाथ झालेली असल्यास सदर योजनेचा लाभ अनुज्ञेय नसेल.

(IV) **सदर योजनेकरीताचा प्रस्ताव व त्यासोबत खालील कागदपत्र सादर करणे आवश्यक असेल.**

१) नमूना अर्ज प्राचार्यांनी साक्षांकित केलेली हार्डकॉपी तसेच ऑनलाईन अर्ज सादर करावा.
२) विद्यार्थ्याच्या वडील/ आई पालकांचे मुळ मृत्यु प्रमाणपत्र जोडण्यात यावे.
३) आई आणि वडील दोघांच्या मृत्युमुळे विद्यार्थी अनाथ झाला असल्यास संबधीत प्राधीकरणाने दिलेले अनाथ असल्याचे स्वसाक्षांकीत प्रमाणपत्र जोडण्यात यावे.
४) १०० रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर विद्यार्थ्याचे कमावते पालक मृत झाले असल्यास व त्यामुळे कोणत्याही प्रकारचे उदरनिर्वाहाचे साधन नसल्याचे शपथपत्र देण्यात यावे.

५) विद्यार्थ्याचे वडील/आई पालक अपघातात मृत झालेले असल्यास पोलिस पंचनामा, एफ.आय.आर. स्वसांक्षाकीत प्रत इ.कागदपत्रे जोडण्यात यावीत.

६) अपघातात मृत पावलेल्या वडील/आई/पालकांचा शवविच्छेदन अहवाल जोडण्यात यावा.

७) विद्यार्थ्याचे बॅंक खात्याची माहिती जोडण्यात यावी.

८) विद्यार्थ्याचे आधार कार्ड स्वसांक्षाकीत केलेले असावे.

९) याव्यतीरिक्त विद्यापीठातर्फे मागणी करण्यात येणाऱ्या दस्तऐवजांची प्रत सादर करावी.

(६.२६) **असाध्य (उदा. हृदयविकाराचा झटका, हृदयउपमार्ग शस्त्रक्रिया, अन्जिओप्लास्टी शस्त्रक्रिया, मूत्रपिंड किंवा इतर अवयव प्रतिरोपण शस्त्रक्रिया, कोणत्याही अवयवाचा कर्करोग, मेंदूविकार, पक्षघात इ.) आजाराच्या उपचारासाठी विद्यार्थ्याने महाविद्यालयाकडे सादर केलेल्या उपचारासाठी हॉस्पीटल कडून घेतलेल्या दरपत्रकाच्या आधारे रु.५०,०००/- अग्रीम देण्यात येईल व विद्यार्थ्याच्या आजाराच्या उपचारानंतर महाविद्यालयाने हॉस्पिटलच्या उपचाराचे मूळदेयक संजीवनी विद्यार्थी सुरक्षा योजना नियमावलीतील नियम क्रं. ६.१७ मधील लागु असलेल्या उपनियमाप्रमाणे सादर केल्यानंतर रु.५०,०००/- देण्यात येतील असे विद्यार्थ्यास असाध्य आजारासाठी उपचारा करीता एकुण रु १,००,०००/- (रु.एक लक्ष) किंवा प्रत्यक्ष झालेला खर्च यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम देण्यात येईल.**

I) सदर अर्थसहाय्य केवळ नियमित विद्यार्थी /विद्यार्थीनीस अनुज्ञेय असेल. अभ्यासक्रम अर्धवट सोडलेल्या किंवा ज्या विद्यार्थी /विद्यार्थीनीने विद्यापीठाच्या मागील सलग चार परीक्षा दिलेल्या नसतील त्यांना सदर योजनेअंतर्गत अर्थसहाय्य अनुज्ञेय नसेल.

II) सदर योजनेअंतर्गत कुठल्याही विद्यार्थी /विद्यार्थीनीस त्यांच्या संपुर्ण शैक्षणिक कारकीर्दीत एकदाच अर्थसहाय्य अनुज्ञेय असेल.

III) **सदर योजनेकरीताचा उपचारापुर्वी महाविद्यालयाने व विद्यार्थ्याने प्रस्ताव व त्यासोबत खालील कागदपत्र सादर करणे आवश्यक असेल.**

१) विद्यार्थी / विद्यार्थीनीचा अग्रीम अर्ज

२) विद्यार्थी / विद्यार्थीनी ने उपचारासाठी हॉस्पिटल ने दिलेले मूळ दरपत्रक.

३) गंभीर आजाराच्या उपचारासाठी केलेले तपासणी अहवाल.

४) अग्रीम रक्कम समायोजन करण्याची संपुर्ण जबाबदारी महाविद्यालयाची राहिल असे महाविद्यालयाचे हमीपत्र

५) विद्यार्थी व पालकाचे रु.१००/- च्या स्टॅपपेपरवरील हमीपत्र :- आजाराचे स्वरुप, हॉस्पिटलचे नाव, वैद्यकीय अधिकाऱ्याचे नाव, हॉस्पिटलच्या दरपत्रकाच्या उल्लेख केलेला असणे आवश्यक.

**IV) सदर योजनेकरीता उपचारानंतर महाविद्यालयाने विद्यार्थ्याचा प्रस्ताव व त्यासोबत खालील कागदपत्र सादर करणे आवश्यक असेल.**

१) अपघातग्रस्त/गंभीर आजारी/शस्त्रक्रिया झालेल्या विद्यार्थ्यास रुग्णालयातून सोडल्याचा (Discharge Card) वैद्यकीय अधिकाऱ्याची स्वाक्षरी व शिक्क्यासह दाखला उपचारासाठी कराव्या लागलेल्या विविध चाचण्यांचे अहवाल व देयके (Investigation Reports & Bills) वैद्यकीय देयके, औषधालयाची देयके, तपासणी अहवाल क्रमवार लावून सादर करावेत.

२) उक्त कागदपत्रांची एकत्रितरीत्या पुर्तता करुन, सदर कागदपत्रे संबंधीत महाविद्यालयाच्या अधिष्ठाता/प्राचार्य यांनी साक्षांकीत करुन विद्यार्थ्याचा उपचारानंतर रुग्णालयातून डिसचार्ज केल्यानंतर १५ (पंधरा) दिवसाच्या आत प्रस्ताव विद्यापीठाकडे सादर करावा.

३) आजारावरील उपचारासाठी रुग्णालयात दाखल केल्यानंतर रुग्णालयातील **स्वतंत्र**

**खोलीचे भाडे** (Private or Semi – Private Room) , **रुग्णवाहिकेचे भाडे, विशेष आहार,**

**टॉनिक, डिसचार्ज नंतरच्या औषधांची देयके इ.** देयके सदर योजनेंतर्गत अर्थसहाय्य देण्यासाठी गृहीत धरले जाणार नाहीत.

४) बॅंकखाते तपशील :- विद्यार्थ्याचे नाव, बॅंकेचे नाव, बॅंकेचे खाते क्रं, बॅंकेचे आयएफएससी कोड, बॅंकेची शाखा

५) विद्यार्थी / विद्यार्थीनी चे आधाराकार्डची स्वंसाक्षांकित प्रत

६) याव्यतीरिक्त विद्यापीठातर्फे मागणी करण्यात येणाऱ्या दस्तऐवजांची प्रत सादर करावी.

७) उपचाराची प्रक्रियापुर्ण होताच १५ दिसाच्या आत देयक समायोजनासाठी पाठविणे बंधनकारक असेल.

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

## संजीवनी विद्यार्थी सुरक्षा योजना (विद्यार्थी व पालकांसाठीचा अर्ज)

## क्लेम फॉर्म (CLAIM FORM)

विद्यार्थ्याचा प्राणघातक अपघात झाला किंवा अपघातात अपंगत्व आल्यास किंवा अपघातात/नैसर्गिक/गंभीर आजाराने मृत पावल्यास/आजारी असल्यास प्रस्तावासोबत क्लेम फॉर्म जोडावा.

**१) दावा धारकाची माहिती :**

(४.५) बहि:शाल शिक्षण मंडळ योजनेंतर्गत आयोजित व्याख्यानमालेसाठी परिसंवाद, चर्चासत्र किंवा शिबीरासाठी प्रस्तावित विषयांची यादी खालील प्रमाणे:

(I) महाविद्यालयातील जेष्ठ (सिनीयर) विद्यार्थी व नविन प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी रॅगिंग प्रतिबंध विषयक समुपदेशन;

(II) रॅगिंग प्रतिबंध विषयी शिक्षक व महाविद्यालयाच्या आवारातील इतर घटक उदा. शिक्षकेतर कर्मचारी, वार्डन, कॅन्टीन स्टाफ, सुरक्षा रक्षक यांचेसाठी व्याख्यानमाला;

(III) महिला सबलीकरण;

(IV) स्त्री भ्रुणहत्या;

(V) व्यसनमुक्ती;

(VI) संवाद कौशल्य विकास; (Teacher–Student/Doctor-Patient Relationship/Communication Skills)

(VII) व्यक्तीमत्व विकास;

(VIII) आपत्ती व्यवस्थापन;

(X) तणाव व्यवस्थापन;

(XI) स्वच्छता-स्वच्छ परिसर व्यवस्थापन;

(XII) वृक्ष व जल संवर्धन.

(४.६) बहि:शाल शिक्षण मंडळ योजनेसाठी विद्यापीठाकडून देण्यात येणाऱ्या अनुदानाचे लेखापरिक्षण (Audit) करण्यासाठी महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासुन अतिरिक्त रु.१,०००/- (रु.एक हजार मात्र) लेखापरिक्षण शुल्क (**Audit Fees**) म्हणुन अनुज्ञेय असतील.

(४.७) बहि:शाल शिक्षण मंडळ योजनेंतर्गतच्या कार्यक्रम/उपक्रमाचे आयोजन महाविद्यालयाने करुन त्याअनुषंगिक सर्व खर्च करावा. सदर योजनेंतर्गत अनुदानाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या महाविद्यालयांनी खर्चाच्या सविस्तर तपशिलासह प्रस्तावास आवश्यक ती सर्व मुळ देयके जोडुन परिपुर्ण प्रस्ताव विद्यापीठास विहित मुदतीत सादर करणे आवश्यक असेल.

(४.८) बहि:शाल शिक्षण मंडळ योजनेसाठीचे अनुदान खर्च करावयाचा तपशील विद्यापीठाने प्रसिध्द केलेल्या/विद्यापीठ वेळोवेळी प्रसिध्द करेल अशा नमुन्यात सादर करणे आवश्यक असेल.

(४.९) बहि:शाल शिक्षण मंडळ योजनेच्या अनुदानाच्या खर्चाचे समायोजन करतांना महाविद्यालयांनी प्रस्तावासोबत खालील कागदपत्रे सादर करणे आवश्यक असेल.

(**I**) कार्यक्रमाचा अहवाल, छायाचित्रे, शक्य असल्यास वृत्तपत्रातील बातम्यांची कात्रणे इ.;

(**II**) व्याख्यात्यांना/वक्त्यांना अदा करण्यात आलेल्या मानधनाची मूळ देयके/व्हाऊचर्स;

(**III**) कार्यक्रमासाठी प्रत्यक्ष झालेल्या इतर प्रशासकीय खर्चाची मूळ देयके;

(**IV**) उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) सनदी लेखापालांकडून (Chartered Accountant) केलेल्या लेखापरिक्षणाचा अहवाल;

(**V**) जमाखर्च/हिशोब, सनदी लेखापालांकडून प्रमाणित केलेल्या जमा खर्चाचा हिशोब;

(**VI**) रु.१,०००/- (रुपये एक हजार मात्र) लेखापरिक्षण शुल्काची (Audit Fees) मुळ पावती

(४.१०) महाविद्यालयांनी बहि:शाल शिक्षण मंडळ या योजनेचा लाभ मिळण्यासाठी प्रस्ताव/अर्ज परिपत्रकान्वये विहित मुदतीत विद्यापीठास सादर करणे अपेक्षीत असेल. विहीत मुदतीत प्राप्त न झालेला अथवा ई-मेलद्वारे प्राप्त झालेला प्रस्ताव नाकारण्याचा विद्यापीठास अधिकार असेल.

(४.११) महाविद्यालयाने सादर केलेल्या अर्जामध्ये महाविद्यालयाचे ज्या बँकेत खाते असेल त्या बँकेचे नाव, खाते क्रमांक, बँकेचा आय.एफ.एस.सी.कोड, बँकेची शाखा, बँकेचा पुर्ण पत्ता इ.माहिती नमुद करणे अनिवार्य असेल. जेणे करुन महाविद्यालयाच्या बँक खात्यामध्ये ईलेक्ट्रॉनिक्स ट्रान्सफरद्वारे (आरटीजीएस) अनुदानाची रक्कम वर्ग करणे विद्यापीठास सोईचे होईल.

(४.१२) सदर योजनेंतर्गत संलग्नित महाविद्यालयाने एका शैक्षणिक वर्षातून किमान एक एकदिवसीय व्याख्यानमाला/शिबीर/परिसंवाद/चर्चासत्र आयोजित करावे असे अपेक्षित आहे. एका कार्यक्रमापेक्षा जास्त कार्यक्रम राबवावयाचे असल्यास त्यास मुभा असेल.

(४.१३) महाविद्यालयाने व्याख्यानमाला/ परिसंवाद / चर्चासत्र / शिबिर आयोजनाकरीता विद्यापीठातर्फे निर्धारीत अनुदानापेक्षा जास्त खर्च केला असल्यास अशा अतिरिक्त खर्चाची विद्यापीठ अदायगी/प्रतिपुर्ती अनुज्ञेय नसेल.

(४.१४) सदर योजनेंतर्गत अनुदान रक्कमेतुन कोणत्याही स्वरुपाच्या भेटवस्तुची रक्कम प्रतिपुर्तीस अनुज्ञेय नसेल.

## योजनांसंबधी संकीर्ण तरतुदी

(८.१) धन्वंतरी विद्याधन योजना, बहि:शाल शिक्षण मंडळ योजना, सावित्रीबाई फुले मुलींकरीता शिष्यवृत्ती योजना, संजीवनी विद्यार्थी सुरक्षा योजना आणि कमवा व शिका योजना या योजनेंतर्गत नियम ठरविणे, नियमांचा अर्थ लावणे तसेच, योजनेंचे लाभार्थी ठरविणेबाबतचा विद्यापीठाने घेतलेला निर्णय अंतिम असेल.

(८.२) सदर सर्व योजनेंतर्गत विहित मुदतीत विद्यापीठास महाविद्यालयामार्फत प्राप्त झालेल्या प्रस्तावांची विद्यापीठाच्या प्रशासकीय स्तरावर छाननी करण्यात येईल. छाननीअंती पात्र प्रस्तावांची यादी तयार करण्यात येवुन अनुदान वाटपासंबंधी कार्यालयीन टिप्पणीस कुलगुरु यांचे मान्यतेनंतर सदर टिप्पणी, पात्र विद्यार्थ्यांची आवश्यक माहितीसह यादी, अनुदानाची रक्कम व इतर यथोचित माहितीचा तक्ता क्रेडीट नोटसह पडताळणी व अनुदानाचे धनादेश/धनाकर्ष तयार करणेकरीता किंवा ईलेक्ट्रॉनीक ट्रान्सफरकरीता विद्यापीठाच्या वित्त व लेखा अधिकारी यांना अग्रेषित करण्यात येईल. सदर प्रशासकीय प्रक्रिया निर्धारित करण्याचा किंवा त्यामध्ये बदल करण्याचा विद्यापीठास अधिकार असेल.

(८.३) प्रस्तावासोबत सादर केलेल्या दस्तऐवजांमध्ये किंवा माहितीमध्ये कालांतराने कोणतेही दस्त किंवा माहिती बनावट अथवा खोटी असल्याचे सिध्द् झाल्यास संबधीत विद्यार्थ्यावर कायदयानुसार शिस्तभंगाची/फौजदारी कारवाई करण्यात येईल / करण्याबाबत संबंधीत महाविद्यालयास निर्देशित करण्यात येईल.

(८.४) सदर सर्व योजनेंतर्गत लाभ घेताना लाभार्थी विद्यार्थी त्याचा प्रस्ताव, त्यामधील माहिती व त्यासोबतची दस्तऐवज यांच्या सत्यतेकरीता वैयक्तिक जबाबदार असेल. तसेच, प्रस्तावाच्या सत्यतेच्या पडताळणीची जबाबदारी लाभार्थी विद्यार्थ्याबरोबरच संबंधित महाविद्यालयांच्या अधिष्ठाता/प्राचार्य यांची असेल.

(८.५) कोणत्याही योजनेंतर्गत सादर केलेला प्रस्ताव अपुर्ण असेल किंवा निर्धारीत मुदतीनंतर विद्यापीठास प्राप्त झाला असेल तर सदर प्रस्ताव नाकारण्याचा विद्यापीठास अधिकार असेल. ई-मेलव्दारे प्राप्त झालेले प्रस्ताव स्वीकारले जाऊ नयेत. अपुर्ण किंवा विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या प्रस्तावासंबंधी विद्यार्थी किंवा त्यांच्या पालकांकडुन तक्रार प्राप्त झाल्यास सदर तक्रारीची संपुर्ण जबाबदारी संबंधित महाविद्यालयांवर असेल.

(८.६) शासनाकडुन, यथोचित प्राधिकरणाकडुन किंवा एखादया संस्थेकडुन विद्यार्थ्यास विद्यावेतन (स्टायपेन्ड) मिळत असल्यास असे विद्यार्थी संजीवनी सुरक्षा योजनेव्यतिरिक्त इतर योजनेचा लाभ घेण्यास पात्र नसतील.

(८.७) सदर सर्व योजनांकरीता उक्त नियमावलीत विहित नियमांव्यतिरिक्त विद्यापीठाने परिपत्रकाव्दारे वेळोवेळी प्रसिध्द् केलेल्या / करण्यात येणाऱ्या अटी व शर्तीचे पालन करणे महाविद्यालय व लाभार्थी विद्यार्थ्यास बंधनकारक असेल.

(८.८) सदर सर्व योजनेअंतर्गत विद्यार्थी / विद्यार्थ्याच्या पालकांना देण्यात येणारे अर्थसहाय्य / अनुदान हे विद्यापीठाच्या स्वनिधीतून देण्यात येत असल्याने, सदर योजनेचा लाभ विद्यार्थी / विद्यार्थ्याच्या पालकांना मिळणारी एक अतिरिक्त सवलत असुन योजनेचा लाभ हा त्यांचा हक्क असणार नाही.

(८.९) सदर योजनांकरीता अटी व शर्तीबाबत निर्णय घेण्याचे अधिकार विद्यापीठाने राखुन ठेवलेले असतील.

(८.१०) सदर योजनांपैकी कुठलीही योजना कुठल्याही स्तरावर बंद करण्याचा किंवा त्यामध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेण्याचे अधिकार विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेस असतील.

(८.११) उपरोक्त नियमावलीत सुधारणा/बदल/निरसन करण्याचा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेस अधिकार असेल. अशा सुधारणा/बदल/निरसन परिपत्रकाद्वारे वेळोवेळी प्रसिध्द् करण्यात येतील व परिपत्रकाद्वारे प्रसिध्द् करण्यात येणाऱ्या अशा सुधारणा/बदल/निरसन हे उक्त नियमावलीचा भाग समजण्यात येतील.

(८.१२) सदर योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने विद्यापीठ ऑनलाईन पध्द्तीने विद्यार्थ्यांकडुन आवेदन मागवु शकेल. ऑनलाईन आवेदनाच्या अनुषंगाने विद्यापीठ परिपत्रक काढुन त्याबाबतची प्रक्रिया विहित करेल. उक्त नियमावलीत नियम विहित असले तरी ऑनलाईन प्रक्रियेच्या अनुषंगाने विद्यापीठाने परिपत्रकान्वये विहित केलेले नियम सदर नियमांची जागा घेतील. अशाप्रकारे प्रख्यापीत करण्यात आलेले परिपत्रक उक्त नियमावलीचा भाग समजण्यात येईल.

(सहपत्र - "अ")

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

## बहि:शाल शिक्षण मंडळ योजना

## प्राचार्यांनी करावयाच्या अर्जाचा नमुना

प्रति,

मा. संचालक विद्यार्थी कल्याण

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,

नाशिक.

महोदय/महोदया,

आपल्या विद्यापीठाच्या बहि:शाल शिक्षण मंडळ योजनेत आम्ही सहभागी होण्यास इच्छूक असून कृपया या योजनेत सहभागी करुन घ्यावे ही नम्र विनंती.

सदर योजनेअंतर्गत आम्हाला अनुदान मंजुर झाल्यास योजनेच्या सर्व अटी व शर्तीचे पालन करण्यास आमची तयारी आहे. त्याचप्रमाणे योजनेसाठी आलेल्या खर्चाचा ताळेबंद, लेखा परिक्षण अहवाल व कार्यक्रमाचा वृतांत विद्यापीठास विहित मूदतीत पाठविण्यात येईल असे लिहून देतो.

आपला

अधिष्ठाता/प्राचार्य

महाविद्यालयाचा शिक्का

संपर्क प्रतिनिधीचे

मो. नं. नाव व सही

महाविद्यालयाचे बॅक खाते क्र -

आय.एफ.एस.सी कोड -

बॅकेचे नाव -

बॅक शाखेचा पत्ता -

## बहि:शाल शिक्षण मंडळ योजनेच्या माध्यमातुन व्याख्यानमाला, परीसंवाद, चर्चासत्र किंवा शिबीर यांच्या आयोजनासाठी विद्यापीठामार्फत प्रदान करण्यात आलेल्या अनुदान रक्कमेचा महाविद्यालयाने खर्च करावयाचा तपशिल

| अ.क्र. | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| अ) | व्याख्यानमालेसाठी ( १ दिवस) | |
| | क. वक्त्याचे मानधन (रु.१,५०० X २) | रु. ३,०००/- |
| | ख. वक्त्यांचा प्रवास खर्च (विद्यापीठाच्या नियमानुसार स्थानिक प्रवासभाडे रु.५००/- प्रतिवक्ता (५०० X २) बाहेरगावहुन आलेल्या वक्त्यांसाठी जास्तीत जास्त रु.१,५००/-X २) | रु.१,०००/- किंवा ३,०००/- |
| | ग. प्रशासकीय व अनुषंगीक खर्च | रु.१,०००/- |
| | प्रति व्याख्यान एकुण | रु.५,०००/- किंवा ७,०००/- |
| ब) | परीसंवाद / शिबीर / चर्चासत्र (२५ व्यक्तींसाठी १ दिवस) | |
| | क. वक्त्याचे मानधन (रु.१,५०० X २ वक्ते) | रु. ३,०००/- |
| | ख. वक्त्यांचा प्रवासखर्च (विद्यापीठाच्या नियमानुसार स्थानिक प्रवासभाडे रु.५००/- प्रतिवक्ता (५०० X २) बाहेरगावहुन आलेल्या वक्त्यांसाठी जास्तीत जास्त रु.१,५०० X २ वक्ते) | रु.१,०००/- किंवा ३,०००/- |
| | ग. सहभागींचा चहापान व (भोजन खर्च - मान्यवरांचा) | रु. १,०००/- |
| | घ. इतर प्रशासकीय व अनुषंगीक खर्च | रु.१,०००/- |
| क) | ऑडीट फी रु. १,०००/- | रु.१,०००/- |
| | एकुण | रु.७,०००/- किंवा ९,०००/- |
| | एकुण (अ + ब + क) | रु.१२,०००/- किंवा रु.१६,०००/- |

बहि:शाल शिक्षण मंडळ योजनेचा

जमा - खर्च

| क्र. | जमा | रक्कम | क्र. | खर्च | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १. | विद्यापीठ अनुदान | | अ. व्याख्यान माला | | |
| | | | १. | मानधन<br>१. श्री.<br>२. श्री. | |
| | | | २. | प्रवासखर्च<br>१. श्री.<br>२. श्री. | |
| | | | ३. | प्रशासकीय खर्च<br>१.<br>२.<br>३.<br>४. | |
| | | | ब. परीसंवाद / चर्चासत्र / शिबीर | | |
| | | | १. | मानधन<br>१. श्री.<br>२. श्री. | |
| | | | २. | प्रवासखर्च<br>१.<br>२. | |
| | | | ३. | चहापान व भोजन खर्च<br>१.<br>२.<br>३. | |
| | | | ४. | प्रशासकीय खर्च | |
| | | | | १.<br>२.<br>३.<br>४. | |
| | | | ५. | ऑडीट फी पावती | |
| एकुण जमा | | | एकुण खर्च | | |

समन्वयक तथा सचिव

अध्यक्ष तथा प्राचार्य

(सही व शिक्का)

सनदी लेखापाल

(सही व शिक्का)

# Utilization Certificate for the Scheme of

**(Name of the Scheme)**

---

(To be given by the Chartered Accountant)

**Certified that the grant of Rs. ( In Figure )…………………………………….. (In Words) Rs..……………………….……………………………………………….…… has been received by the Dean / Principal of (College name ) …………………………….……………………….……… ……………………………………………………………..……………………………. from Maharashtra University of Health Sciences, Nashik through DD. No. ...………… Dtd…../…../…..….. for the Scheme ( Name of the scheme ) …………………………………………………………………………..……………**

**With reference to the Vouchers and books of accounts, submitted to me, it is hereby certified that Dean / Principal of this College / Institute has utilized the grant of Rs……………… (In Figure) (in words) Rs.......................................................................................... for the said purpose.**

**The DD No. ……………… Dtd. ……/…..../……….. of unspent grant of Rs. …………….. ( In Figure ) in words) Rs…………………………………………………………) is returned herewith.**

**Place :**

**Date :**

**Signature, Name, Stamp & Seal of
Chartered Accountant**

**Signature, Name, Stamp & Seal of
Dean / Principal**

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK

दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक – ४२२००४, Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004

Tel:( 0253 2539170/169/6659170/169

☎ Student Helpline: 0253-2539111/6659111/100

Website: www.muhs.ac.in, E-mail: sw@muhs.ac.in

**डॉ. देवेंद्र शेषराव पाटील**
एम.डी.(होमिओपॅथी)
**संचालक, विद्यार्थी कल्याण**

**Dr. Devendra Sheshrao Patil**
**M.D. (Homoeopathy)**
**Director, Student Welfare**


मआविवि/एसडब्ल्यू/स्किम/९०१/२०२५

दि.२०/०६/२०२५

"परिपत्रक क्र.१३/२०२५"

प्रति,
मा. अधिष्ठाता/प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
म. आ. वि. वि. नाशिक.

विषय : कमवा व शिका योजनेबाबत...

महोदय/ महोदया,

कमवा व शिका योजनेचे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयांमध्ये पदवीपुर्व नियमित शिक्षण घेत असलेल्या गरीब, गरजु, हुशार विद्यार्थ्यांचे प्रस्ताव विद्यापीठामार्फत मागविण्यात येत आहेत.

कमवा व शिका योजनेत आर्थिक अडचणीमुळे कोणत्याही विद्यार्थ्याचे शिंक्षण थांबू नये याच भूमिकेतून विद्यापीठाने "कमवा व शिका" ही योजना अंमलात आणली आहे. गरीब, होतकरु व नियमित विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असतांना निवडक स्वरुपाच्या कामांची संधी उपलब्ध करुन देऊन त्या मोबदल्यात नियमानुसार योग्य तो मेहनताना देवून त्यांच्या आर्थिक गरजा भागविणे व त्यांच्या शिक्षणास हातभार लावणे हा योजनेचा मुख्य हेतू आहे.

कमवा व शिका या योजने अंतर्गत एका महाविद्यालयांतुन पाच प्रस्ताव स्विकारण्यात येतील. सदर योजनेअंतर्गत ३% आरक्षण दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी असेल तसेच आपल्या महाविद्यालयातील दिव्यांग विद्यार्थ्यांचे प्रस्ताव महाविद्यालय स्तरावर निवड करुन सादर करण्यात यावेत. उपरोक्त नियमावली अंतर्गत पात्र विद्यार्थ्यांचे प्रस्ताव महाविद्यालयांच्या कव्हरींग लेटरसह दि.०८/०८/२०२५ पर्यंत विद्यापीठात स्विकारण्यात येतील. सदर योजनेचा लाभ घेण्यासाठीची नियमावली सोबत जोडलेली आहे. उशिरा तथा विलंबाने प्राप्त झालेल्या कोणत्याही प्रस्तावावर विद्यापीठ कार्यवाही करणार नाही. तसेच योजने सबंधीचे प्रस्ताव अर्ज (विहित नमुन्यातील सहपत्र "अ") व इतर कागदपत्रे विद्यार्थी कल्याण विभागात परस्पर स्वीकारले जाणार नाहीत कृपया याची नोंद घ्यावी.

विद्यापीठाच्या योजना हया विद्यार्थ्यांना मिळणारी सवलत आहे, त्यांचा हक्क नाही असे त्यांना अवगत करण्यात यावे. तसेच सर्व अटी व शर्तीबाबत अंतिम निर्णय घेण्याचे व त्यात बदल करण्याचे अधिकार विद्यापीठाने राखीव ठेवलेले आहेत.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासुन महाविद्यालयाने खालील नमुद केलेल्या सुचना प्रमाणे ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावयाचा आहे. महाविद्यालयाच्या प्रतिनिधीने विद्यार्थी व विद्यार्थीनीच्या अर्जाची छाननी करुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावयाचा आहे तसेच विद्यार्थी व विद्यार्थीनीच्या ऑनलाईन भरलेल्या अर्जाची हार्ड कॉपी विद्यापीठाकडे सादर करावायाची आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याची कार्यपध्दती खाली नमुद केलेली आहे.

टिप :

१)वर नमुद योजनेची सविस्तर माहिती, नियमावली, विविध अर्ज व नमुने विद्यापीठाच्या **www.muhs.ac.in** या संकेतस्थळावर **Department → Student Welfare→ Circular 2025-26** उपलब्ध आहे.

२)महाविद्यालयाने ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावयाची प्रक्रिया

**Step 1 –** कॉलेजने खालील लिंकव्दारे ऑन-बोर्डींग प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे तसेच सिस्टीम मध्ये क्रेडेन्शियल्स प्राप्त करणे गरजेचे आहे. अर्ज करण्यासाठी लिंक **:https://automation.muhs.ac.in/**

**Step 2 –** कॉलेजने ऑन-बोर्डींग पूर्ण झाल्यानंतर विद्यमान विद्यार्थ्यांचा डेटा तपासणे आणि प्रमाणित करणे आवश्यक आहे. ज्या विद्यार्थ्यांनी योजनांसाठी अर्ज केले आहेत ते आधी तपासणी करुन नंतर उर्वरीत विद्यार्थ्यांची पडताळणी करणे चालेल. एकतर विद्यार्थी रेकॉर्ड सिस्टममध्ये अस्तित्वात असेल किंवा अस्तिवात नसेल.

१) जर विद्यार्थ्यांचे रेकॉर्ड अस्तित्वात असल्यास - तपशील ऑनलाईन उपलब्ध दिसत असतील तर College Desk व्दारे सर्व संबधीत तपशील अद्ययावत करा.

२) जर विद्यार्थ्यांचे रेकॉर्ड्स अस्तित्वात नसल्यास - तपशील ऑनलाईन उपलब्ध दिसत नसतील तर College Desk वापरुन विद्यार्थ्यांचे रेकॉर्ड नव्याने भरा.

**Step 3 –** योजनेचे अर्ज विद्यार्थ्यांकडून कॉलेजने ऑफलाईन पध्दतीने (Hard Copy) मध्ये घ्यावेत.

१) कॉलेजने ऑनलाईने प्रणालीमध्ये अशाच विद्यार्थ्यांचे अर्ज प्रविष्ट करावेत ज्या विद्यार्थ्यांने हार्ड कॉपीमध्ये अर्ज केला आहे व ऑफलाईन आलेल्या अर्जाची कॉलेजच्या स्तरावर छाननीनंतर कॉलेजने MUHS कडे ऑनलाईन अर्ज सादर करावेत.

टिप - ऑनलाईन अर्ज सादर करताना काही तांत्रिक समस्या असल्यास कृपया कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत खालील क्रमांकावर संपर्क साधावा. ८०८७९९५८८३, ९९६०६९७८८३ (सी-डॅक संस्थेचे प्रतिनिधी) ई-मेल आयडी - muhs.application.helpdesk@gmail.com

महाविद्यालयाने प्रस्ताव सादर करतांना तपासणी सूची (सहपत्र "ब") प्रमाणे दस्तावेज तपासुन अनुक्रमाप्रमाणे पृष्ठांकीत करुन सादर करावेत.

Sd/-

संचालक
विद्यार्थी कल्याण

प्रत माहितीस्तव : १) मा. कुलगुरु कार्यालय, मआविवि, नाशिक
२) मा. कुलसचिव कार्यालय, मआविवि, नाशिक
३) मा. वित्त व लेखा अधिकारी, मआविवि, नाशिक
४) सर्व विभाग प्रमुख, मआविवि, नाशिक

# कमवा व शिका योजना नियमावली

(७.१) प्रस्तावना :- विद्यापीठांतर्गत आरोग्य विज्ञानाच्या अभ्यासक्रमास प्रवेशीत कोणत्याही विद्यार्थ्यांचे शिक्षण आर्थिक अडचणीमुळे थांबू नये या भूमिकेतून व विद्यार्थ्यास काही प्रमाणात आर्थिक स्वावलंबी बनविण्याकरीता विद्यापीठाने "कमवा व शिका" ही योजना अंमलात आणली आहे. गरीब, होतकरु व नियमित विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असतांना निवडक स्वरुपाच्या व शैक्षणिक बाबींशी निगडीत कामांची संधी उपलब्ध करुन त्याच्या मोबदल्यात नियमानुसार योग्य तो आर्थिक मोबदला देऊन त्यांच्या काही प्रमाणात आर्थिक गरजा भागविणे व त्यांच्या शिक्षणास हातभार लावणे हा योजनेचा मुख्य उद्‌देश असुन सदर योजनेचे नियम याद्वारे विहित करण्यात आलेले आहेत.

(७.२) सदर योजनेचा लाभ केवळ विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयात पदवी अभ्यासक्रमाचे नियमित शिक्षण घेणारा, मागील शैक्षणिक वर्षात उत्तीर्ण झालेल्या, गरीब व गरजू विद्यार्थ्यांना अनुज्ञेय असेल. खालील विद्यार्थी या योजनेचा लाभ घेण्यास अपात्र असतील :-

(I) आंतरवासियता (Internship) प्रशिक्षणार्थी;

(७.३) विद्यार्थ्यास केंद्र / राज्य शासनाच्या किंवा अन्य संस्थाकडून शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, फेलोशिप शुल्क परतावा, शुल्क सवलत किंवा इतर काही अनुदान मिळत असले तरी देखील असे विद्यार्थी सदर योजनेंतर्गत लाभ घेण्यास पात्र असतील.

(७.४) कमवा व शिका योजनेचा कालावधी एका शैक्षणिक वर्षात ८ महिने असुन कमवा व शिका योजनेतंर्गत महाविद्यालयातील पात्र ठरविण्यात आलेल्या विद्यार्थ्यांना कामाचा आर्थिक मोबदला म्हणुन आठ महिन्यांकरीता रु.२०,०००/- प्रती विद्यार्थी या प्रमाणे अनुदान अनुज्ञेय असेल. विद्यापीठाचे सदर अनुदान प्रति तास रु.६२.५०×२ तास ×२० दिवस = रु.२,५००/- दरमहा ×०८ महिने = रु.२०,०००/- अशाप्रकारे सुट्टयांचे दिवस वगळून दरमहा, आठ महिन्यांकरीता असेल.

तसेच शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून अनुदानाचे ऑडीट करण्यासाठी महाविद्यालयांना एकरकमी रु.१०००/- (एक हजार) ऑडीट फी म्हणून देण्यात येईल.

(७.५) ज्या आवेदनकर्ता विद्यार्थ्याच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न शासन / विद्यापीठाने वेळोवेळी विहित केलेल्या मर्यादेपेक्षा कमी असेल असे विद्यार्थी योजनेचा लाभ घेण्यास पात्र असतील. महाविद्यालयातील पात्र विद्यार्थ्यांची यादी तयार करताना ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न सर्वात कमी असेल अशा विद्यार्थ्यांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल. सदर योजनेंतर्गत विद्यापीठाच्या दरवर्षीच्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात सदर योजनेकरीता केलेल्या आर्थिक तरतूदीच्या कमालमर्यादेत अनुदानाचे वाटप करण्यात येईल.

(७.६) कमवा व शिका योजनेसाठी उत्पन्नाचा समान निकष धारण करणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी पात्र उमेदवाराची निवड करण्यासाठी क्रमाने खालील निकषांचा अवलंब करण्यात येईल.

अ) मागिल वर्षाचे गुण (ज्या विद्यार्थ्यास जास्त गुण असतील तो पात्र)

ब) प्रयत्न (Attempts) (मागील वर्षात किती प्रयत्नांमध्ये विद्यार्थी उत्तीर्ण झाला)

क) मुलींना प्राधान्य.

(७.७) कमवा व शिका योजनेचा आठ महिन्यांचा कालावधी संपताच १५ दिवसांच्या आत समायोजनासाठी महाविद्यालयाने प्रस्ताव विद्यापीठास सादर करणे आवश्यक असेल. महाविद्यालयाने सादर केलेल्या प्रस्तावात अर्जामध्ये महाविद्यालयाचे बॅंकेचे खाते असलेले नाव, खाते क्रमांक, आय.एफ.एस.सी. कोड, बॅंकेची शाखा, बॅंकेचा पुर्ण पत्ता नमुद करणे अनिवार्य असेल. आणि कॅन्सल धनादेशाची प्रत सोबत जोडण्यात यावी. (जेणे करुन महाविद्यालयाच्या बॅंक खात्यामध्ये ईलेक्ट्रॉनिक ट्रान्सफर / आर.टी.जी.एस. द्वारे अनुदानाची रक्कम जमा करणे सोईस्कर होईल) .

(७.८) विद्यार्थ्याने / महाविद्यालयाने प्रस्ताव व प्रस्तावासोबत जोडुन सादर करावयाची आवश्यक कागदपत्रे/दस्तऐवज खालीलप्रमाणे आवश्यक कागदपत्रे/ दस्तऐवज जोडून सादर करणे आवश्यक असेल.

(I) विद्यार्थ्याचा प्राचार्यानी साक्षांकीत केलेला ऑनलाईन अर्ज

(II) लगतच्या गतवर्षी अभ्यासक्रमाच्या उत्तीर्ण झालेल्या विद्यापीठाच्या परिक्षेच्या गुणपत्रकाची स्वसाक्षांकित छायाप्रत.

(III) विद्यार्थ्याच्या पालकांचा मागील आर्थिक वर्षाचा २०२५-२६ संबंधित तहसीलदार कार्यालय / यथाचित प्राधिकारी यांनी दिलेला वार्षिक उत्पन्नाच्या दाखल्याची स्वसाक्षांकित प्रत. (इतर कोणत्याही प्रकारचा दाखला ग्राहय धरण्यात येणार नाही याची नोंद घेण्यात यावी.)

(IV) विद्यार्थ्याच्या आधारकार्डची स्वसाक्षांकीत छायाप्रत.

(७.९) विद्यार्थ्यास केलेले कामाचे वाटप, विद्यार्थ्याची त्यासाठीची उपस्थिती व विद्यार्थ्यास अनुदानाची रक्कम अदा केल्याची धनाकर्षाची छायांकीत प्रत महाविद्यालयाने विद्यापीठास सादर करणे आवश्यक असेल. विद्यार्थ्यास कामाच्या वाटपाची संपुर्ण जबाबदारी महाविद्यालयाची असेल.

(७.१०) तसेच शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून अनुदानाचे ऑडीट करण्यासाठी महाविद्यालयांना एकरकमी रु.१०००/- (एक हजार) ऑडीट फी म्हणून देण्यात येईल.

## योजनांसंबधी संकिर्ण तरतुदी

(८.१) धन्वंतरी विद्याधन योजना, बहि:शाल शिक्षण मंडळ योजना, सावित्रीबाई फुले मुलींकरीता शिष्यवृत्ती योजना, संजीवनी विद्यार्थी सुरक्षा योजना आणि कमवा व शिका योजना या योजनेंतर्गत नियम ठरविणे, नियमांचा अर्थ लावणे तसेच, योजनेंचे लाभार्थी ठरविणेबाबतचा विद्यापीठाने घेतलेला निर्णय अंतिम असेल.

(८.२) सदर सर्व योजनेंतर्गत विहित मुदतीत विद्यापीठास महाविद्यालयामार्फत प्राप्त झालेल्या प्रस्तावांची विद्यापीठाच्या प्रशासकीय स्तरावर छाननी करण्यात येईल. छाननीअंती पात्र प्रस्तावांची यादी तयार करण्यात येवुन अनुदान वाटपासंबंधी कार्यालयीन टिप्पणीस कुलगुरु यांचे मान्यतेनंतर सदर टिप्पणी, पात्र विद्यार्थ्यांची आवश्यक माहितीसह यादी, अनुदानाची रक्कम व इतर यथोचित माहितीचा तक्ता क्रेडीट नोटसह पडताळणी व अनुदानाचे धनादेश/धनाकर्ष तयार करणेकरीता किंवा ईलेक्ट्रॉनीक ट्रान्सफरकरीता विद्यापीठाच्या वित्त व लेखा अधिकारी यांना अग्रेषित करण्यात येईल. सदर प्रशासकीय प्रक्रिया निर्धारित करण्याचा किंवा त्यामध्ये बदल करण्याचा विद्यापीठास अधिकार असेल.

(८.३) प्रस्तावासोबत सादर केलेल्या दस्तऐवजांमध्ये किंवा माहितीमध्ये कालांतराने कोणतेही दस्त किंवा माहिती बनावट अथवा खोटी असल्याचे सिध्द् झाल्यास संबधीत विद्यार्थ्यावर कायदयानुसार शिस्तभंगाची/फौजदारी कारवाई करण्यात येईल / करण्याबाबत संबंधीत महाविद्यालयास निर्देशित करण्यात येईल.

(८.४) सदर सर्व योजनेंतर्गत लाभ घेताना लाभार्थी विद्यार्थी त्याचा प्रस्ताव, त्यामधील माहिती व त्यासोबतची दस्तऐवज यांच्या सत्यतेकरीता वैयक्तिक जबाबदार असेल. तसेच, प्रस्तावाच्या सत्यतेच्या पडताळणीची जबाबदारी लाभार्थी विद्यार्थ्याबरोबरच संबंधित महाविद्यालयांच्या अधिष्ठाता/प्राचार्य यांची असेल.

(८.५) कोणत्याही योजनेंतर्गत सादर केलेला प्रस्ताव अपुर्ण असेल किंवा निर्धारीत मुदतीनंतर विद्यापीठास प्राप्त झाला असेल तर सदर प्रस्ताव नाकारण्याचा विद्यापीठास अधिकार असेल. ई-मेलव्दारे प्राप्त झालेले प्रस्ताव स्वीकारले जाऊ नयेत. अपुर्ण किंवा विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या प्रस्तावासंबंधी विद्यार्थी किंवा त्यांच्या पालकांकडुन तक्रार प्राप्त झाल्यास सदर तक्रारीची संपुर्ण जबाबदारी संबंधित महाविद्यालयांवर असेल.

(८.६) शासनाकडुन, यथोचित प्राधिकरणाकडुन किंवा एखादया संस्थेकडुन विद्यार्थ्यास विद्यावेतन (स्टायपेन्ड) मिळत असल्यास असे विद्यार्थी संजीवनी सुरक्षा योजनेव्यतिरिक्त इतर योजनेचा लाभ घेण्यास पात्र नसतील.

(८.७) सदर सर्व योजनांकरीता उक्त नियमावलीत विहित नियमांव्यतिरिक्त विद्यापीठाने परिपत्रकाव्दारे वेळोवेळी प्रसिध्द् केलेल्या / करण्यात येणाऱ्या अटी व शर्तीचे पालन करणे महाविद्यालय व लाभार्थी विद्यार्थ्यास बंधनकारक असेल.

(८.८) सदर सर्व योजनेअंतर्गत विद्यार्थी / विद्यार्थ्याच्या पालकांना देण्यात येणारे अर्थसहाय्य / अनुदान हे विद्यापीठाच्या स्वनिधीतून देण्यात येत असल्याने, सदर योजनेचा लाभ विद्यार्थी / विद्यार्थ्याच्या पालकांना मिळणारी एक अतिरिक्त सवलत असुन योजनेचा लाभ हा त्यांचा हक्क असणार नाही.

(८.९) सदर योजनांकरीता अटी व शर्तीबाबत निर्णय घेण्याचे अधिकार विद्यापीठाने राखुन ठेवलेले असतील.

(८.१०) सदर योजनांपैकी कुठलीही योजना कुठल्याही स्तरावर बंद करण्याचा किंवा त्यामध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेण्याचे अधिकार विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेस असतील.

(८.११) उपरोक्त नियमावलीत सुधारणा/बदल/निरसन करण्याचा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेस अधिकार असेल. अशा सुधारणा/बदल/निरसन परिपत्रकाद्वारे वेळोवेळी प्रसिध्द् करण्यात येतील व परिपत्रकाद्वारे प्रसिध्द् करण्यात येणाऱ्या अशा सुधारणा/बदल/निरसन हे उक्त नियमावलीचा भाग समजण्यात येतील.

(८.१२) सदर योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने विद्यापीठ ऑनलाईन पध्द्तीने विद्यार्थ्याकडुन आवेदन मागवु शकेल. ऑनलाईन आवेदनाच्या अनुषंगाने विद्यापीठ परिपत्रक काढुन त्याबाबतची प्रक्रिया विहित करेल. उक्त नियमावलीत नियम विहित असले तरी ऑनलाईन प्रक्रियेच्या अनुषंगाने विद्यापीठाने परिपत्रकान्वये विहित केलेले नियम सदर नियमांची जागा घेतील. अशाप्रकारे प्रख्यापीत करण्यात आलेले परिपत्रक उक्त नियमावलीचा भाग समजण्यात येईल.

(सहपत्र "अ")

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

"कमवा व शिका" योजनेतंर्गत प्रवेश मिळविण्यासाठी

विद्यार्थ्यांने करावयाचा नमुना अर्ज

पासपोर्ट
आकाराचा
फोटो

१. विद्यार्थ्याचे संपूर्ण नाव :————————————————

२. शिकत असलेल्या महाविद्यालयाचे नाव :————————————————

३. विद्यार्थ्याचा कायम निवासी पत्ता:————————————————

————————————————

————————————————

४. मोबाईल नंबर / दुरध्वनी क्र. (STD) कोडसह:————————————————

५. ईमेल आयडी:- ————————————————

६. जन्म तारीख:- ———————————— वय:- ————————वर्ष

७. सध्या शिकत असलेला वर्ग आणि कोर्स:————————————————

८. मागीलवर्षी झालेल्या परीक्षेत मिळालेले एकूण गुण व टक्केवारी (%):————————

(गतवर्षीच्या गुणपत्रिकेची स्वसांक्षांकित प्रत सोबत जोडावी.)

९. वडीलांचे/पालकांचे संपूर्ण नाव श्री / श्रीमती:————————————————

१०. नोकरी / व्यवसाय————————————————

११. एकत्रित वार्षिक उत्पन्न :रु.————————(तहसिलदारांनी दिलेल्या उत्पन्नाचा दाखला स्वसांक्षांकित करुन जोडावा.)

१२. कोणते काम निवडले आहे.: १)————————————————

२)————————————————

३)————————————————

१३. अध्ययन तासिका कालावधी :————————————————

१४. मागास वर्गीय असल्यास प्रकार : ———————— प्रवर्ग : ————————

१५. विद्यार्थ्यांचा आधारकार्ड नंबर : ———————— (आधारकार्ड स्वसाक्षांकीत प्रत सोबत जोडणे अनिवार्य )

१६. योजनेच्या अटी, शर्ती, हिशोब, आर्थिक व्यवहार याबाबत सर्व नियमांचे मी पालन करीन व माझ्या शैक्षणिक अध्ययनात खंड पडू देणार नाही अशी मी हमी देतो/देते.

वर नमूद केलेली सर्व माहिति खरी आहे.

विभाग प्रमुखाचे नाव व स्वाक्षरी

विद्यार्थ्यांचे नाव व स्वाक्षरी

सदर विद्यार्थी गरीब व गरजु असून योजनेसाठी दिलेली माहिती खरी आहे.

महाविद्यालयाचा शिक्का

अधिष्ठाता/प्राचार्याची सही

(सहपत्र "ब")

# तपासणी सुची (Check List)

| अ.क्र. | सादर करावयाची कागदपत्रे | होय/नाही | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | विद्यापीठाने उपलब्ध करुन दिलेला सहपत्र "अ"(नमुना अर्ज ) परिपुर्ण भरला आहे काय ? | | |
| २ | गतवर्षात उत्तीर्ण झाल्याचे गुणपत्रकाची स्वसाक्षांकीत प्रत जोडली आहे काय ? | | |
| ३ | गतवर्षाचा उत्पन्नाच्या दाखल्याची स्वसाक्षांकीत प्रत (आर्थिक वर्ष २०२४ - २५) जोडली आहे काय ? (फक्त तहसिलदार कार्यालयाचा दाखला) | | |
| ४ | विद्यार्थ्याचा/विद्यार्थीनीचा प्राचार्यानी स्वाक्षांकीत केलेल्या ऑनलाईन अर्जाची प्रत | | |
| ५ | आधार कार्ड ची स्वसाक्षांकीत प्रत | | |

टिप :- महाविद्यालयाने प्रस्तावांची पुर्तता करतांना तपासणी सूची प्रमाणे दस्तावेज तपासून अनुक्रमाप्रमाणे पृष्ठांकीत करुन सादर करावेत.

**College Clerk** **Dean/Principal**
**Mob. No.**

**(Name, Signature & Stamp)**

## -: कमवा व शिका योजना :-

प्रस्तावना :-

१) संलग्नित महाविद्यालयातील गरीब व हुशार विद्यार्थ्याना लागु.

२) निवडक स्वरुपाच्या कामाची संधी उपलब्ध करुन दिली जाते.

३) शिक्षणास थोडाफार हातभार लावणे हा हेतू.

४) स्वावलंबनाने श्रमप्रतिष्ठा वाढविणे

योजने अंतर्गत कामाचे स्वरुप - नमुना यादी :

१) फार्मसी शॉप सहाय्यक.

२) केस पेपर बनविणे.

३) ग्रंथालयातील कामे.

४) झेरॉक्स काम करणे.

५) ग्राहक भांडार सहाय्य.

६) वसतीगृह सहाय्यक.

७) इतर क्लिनीकल कामे.

८) महाविद्यालयातील गरजेनुसार काम करणे.

९) फ्रुट स्टॉल चालविणे.

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,नाशिक
**Maharashtra University of Health Sciences, Nashik**

MUHS

वणी दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004
Tel : (0253) 2539172/169/171 ☎ Student Helpline : 0253-2539111/6659111
Website: www.muhs.ac.in, E-mail: sw@muhs.ac.in

**डॉ. देवेंद्र शेषराव पाटील** | **Dr. Devendra Sheshrao Patil**
एम.डी.(होमिओपॅथी) | M.D. (Homoeopathy)
**संचालक, विद्यार्थी कल्याण** | Director, Student Welfare


जा.क्र.:मआविवि/एस.डब्ल्यु/क्रीडा/१०९८ /२०२५ दि. १८ /०७/२०२५

**परिपत्रक क्र. २१ /२०२५**

**प्रति,**
सर्व संलग्नित महाविद्यालये,
म.आ.वि.वि.,
**नाशिक - ४२२००४.**

**विषय : क्रीडा महोत्सव २०२५-२६ साठी विभागीय, आंतरविभागीय, सराव शिबीर व (A.I.U) निवड चाचणी क्रीडा स्पर्धोचे आयोजन करणेसाठी प्रस्ताव मागविणेबाबत...**

**महोदय / महोदया,**

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कार्यक्षेत्र हे सपुर्ण महाराष्ट्र राज्य असुन विविध आरोग्य विज्ञानाच्या विद्याशाखांची महाविद्यालये विद्यापीठाशी संलग्नित आहे. विद्यापीठाद्वारे खेळाडु विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व क्रीडा प्रकारांना वाव मिळावा, तसेच चालना मिळावी व त्यांना आपले कौशल्य दाखविण्याची संधी मिळावी, म्हणुन विद्यापीठ राज्यशासन तसेच केंद्रशासन यांच्या आदेशानुसार विविध क्रीडा स्पर्धाचे उपक्रम विद्यार्थी कल्याण विभागामार्फत राबविण्यात येत असतात.

मा. कुलपती तथा महाराष्ट्र राज्याचे महामहिम राज्यपाल यांच्याद्वारे दरवर्षी महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सवाचे आयोजन राज्यातील विविध विद्यापीठांमध्ये करण्यात येते. त्याअनुषंगाने नमूद करण्यात येते की, महामहिम राज्यपाल यांचे प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली सल्लागार मंडळाच्या बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत क्रीडा महोत्सवाच्या स्पर्धेमध्ये वैकल्पिक क्रीडा प्रकारांतर्गत सदर निर्णयाच्या अनुषंगाने दरवर्षी होणारे नियमित ०५ क्रीडा प्रकारा व्यतीरीक्त बॅडमिंटन, टेबल टेनिस, बुध्दीबळ आणि फुटबॉल या क्रीडा प्रकारांचा क्रीडा महोत्सवमध्ये समावेश करण्यात आला आहे.

सदर क्रीडा महोत्सवाच्या अनुषंगाने महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ संघाची निवड हि राज्यातील प्रत्येक महसूल विभागातील (मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपुर, व अमरावती) विद्यापीठ कार्यक्षेत्रानुसार सहा विभागांमधुन करण्यात येत असते. त्यानुसार विभागीय निवड चाचणी क्रीडा ( Zonal Selection Trial ) स्पर्धाचे आयोजन तसेच आंतर विभागीय निवड चाचणी क्रीडा स्पर्धा ( Inter Zonal Selection Trial ) तसेच सराव शिबीराचे आयोजन करणे क्रमप्राप्त आहे.

सदर विद्यापीठ संघ निवडीच्या अनुषंगाने प्रथम दरवर्षीप्रमाणे मुख्य ०५ क्रीडा प्रकारांकरीता (खो-खो, कबड्डी, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल व मैदानी स्पर्धा- १०० मी., २०० मी., ४०० मी., ८०० मी., १५०० मी., व ५००० मी., ४ × १०० मी. रिले व ४ × ४०० मी, लांब उडी, उंच उडी, तिहेरी उडी,

गोळा फेक, थाळी फेक व भाला फेक इ.) सहा विभागामधुन प्रत्येकी १२० खेळाडु विद्यार्थी असे एकुण ७२० खेळाडु विद्यार्थ्यांची निवड आंतर विभागीय क्रीडा स्पर्धेसाठी करण्यात येते. आंतर विभागीय ( Inter Zonal Selection Trial ) निवड चाचणी स्पर्धेतुन ७२० खेळाडु विद्यार्थ्यांपैकी सराव शिबीर ( Coaching Camp ) व क्रीडा महोत्सवासाठी १२० खेळाडु विद्यार्थ्यांच्या संघाची निवड करण्यात येणार आहे.

तसेच क्रीडा महोत्सवामध्ये मुख्य ०५ क्रीडा प्रकारा व्यतिरिक्त वैकल्पिक क्रीडा प्रकार (टेबल टेनिस, बॅडमिंटन, बुध्दीबळ व फुटबॉल) अंतर्गत येणारा क्रीडा प्रकारांचा अखिल भारतीय विद्यापीठ संघाचे (ए.आय.यू.) क्रीडा स्पर्धामध्ये देखील समावेश असल्याने विद्यापीठाने या सर्व क्रीडा प्रकारांसाठी स्वंतत्र क्रीडा प्रकारनिहाय निवड चाचणीचे आयोजन करुन अंतीम संघ निवड करण्याचे निर्णय घेतला आहे.

सदर क्रीडा महोत्सवाच्या अनुषंगाने, विभागीय निवड चाचणी क्रीडा ( Zonal Selection Trial ) स्पर्धाचे आयोजन अंदाजे माहे सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या/दुसऱ्या आठवडयात तसेच आंतर विभागीय (Inter Zonal Selection Trial) निवड चाचणी स्पर्धा अंदाजे माहे ऑक्टोंबर महिन्याच्या दुसऱ्या/तिसऱ्या आठवडयात व सराव शिबीर (Coaching Camp) अंदाजे माहे नोव्हेंबर महिन्याच्या तिसऱ्या/चौथ्या आठवडयात आयोजित करावयाचे प्रस्तावित आहे. त्याअनुषंगाने उक्त नमूद केल्याप्रमाणे मुख्य ०५ क्रीडा प्रकारासाठीचे विभागीय, आंतरविभागीय व दोन स्वतंत्र सराव शिबीर आयोजन करण्यासाठी सहा महसुल विभागातील विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांकडून आयोजनाचे प्रस्ताव मागविण्यात येत आहे. तसेच ए.आय.यु. क्रीडा प्रकारासाठी (बॅडमिंटन, बुध्दीबळ, टेबल टेनिस, फुटबॉल, जलतरण, लॉन टेनिस, योगा व क्रीकेट) देखील आयोजनाबाबतचे प्रस्ताव मागविण्यात येत आहे. तरी इच्छुक महाविद्यालयांनी त्यांचे प्रस्ताव दि.०३/०८/२०२५ पर्यत विद्यापीठात पोहचतील याप्रमाणे पाठविण्यात यावे.

९८/०७/२०२५

संचालक,
विद्यार्थी कल्याण

(सहपत्र - "अ")

# क्रीडा स्पर्धासाठी आवश्यक मैदाने व निवास व्यवस्थेबाबतचा तक्ता

| अ.क्र | क्रीडा प्रकाराची नांवे | क्रीडांगण प्रकार | निवास व्यवस्थासाठी (संख्या) |
|---|---|---|---|
| ०१. | विभागीय स्पर्धा (१. मुंबई २. पुणे ३. नाशिक ४. औरंगाबाद ५. नागपुर ६. अमरावती) | | |
| | १. व्हॉलीबॉल | ०४ कोर्ट | ३०० ते ४०० विद्यार्थी (मुले / मुली) आणि क्रीडा शिक्षक (स्त्री / पुरुष) |
| | २. बास्केटबॉल | ०३ कोर्ट | |
| | ३. खो-खो | ०४ कोर्ट | |
| | ४. कबड्डी | ०४ कोर्ट | |
| | ५. मैदानी खेळ (Athletic) | ४०० मी. ट्रॅक | |
| | (१०० मीटर, २०० मीटर, ४०० मीटर, ८०० मीटर, १५०० मीटर, ४ x १०० मी. रिले, ४ x ४०० मी. रिले, लांब उडी, उंच उडी, गोळा फेक, थाळी फेक, भाला फेक, तिहेरी उडी) | | |
| ०२. | आंतर विभागीय स्पर्धा | | |
| | १. व्हॉलीबॉल | ०४ कोर्ट | ७२० विद्यार्थी (मुले / मुली) आणि २० क्रीडा शिक्षक (स्त्री / पुरुष) |
| | २. बास्केटबॉल | ०३ कोर्ट | |
| | ३. खो-खो | ०४ कोर्ट | |
| | ४. कबड्डी | ०४ कोर्ट | |
| | ५. मैदानी खेळ (Athletic) | ४०० मी. ट्रॅक | |
| | (१०० मीटर, २०० मीटर, ४०० मीटर, ८०० मीटर, १५०० मीटर, ४ x १०० मी. रिले, ४ x ४०० मी. रिले, लांब उडी, उंच उडी, गोळा फेक, थाळी फेक, भाला फेक, तिहेरी उडी) | | |
| ०३. | सराव शिबीर (मुले व मुलांसाठी) विद्यार्थी - ९४, संघ व्यवस्थापक - ०९, क्रीडा समन्वयक - ०१ (एकुण - १०४) | | |
| | १. व्हॉलीबॉल | ०२ कोर्ट | १२ मुले + ०१ (सं.व्य.) |
| | २. बास्केटबॉल | ०२ कोर्ट | १२ मुले + ०१ (सं.व्य.) |
| | ३. खो-खो | ०२ कोर्ट | १२ मुले + ०१ (सं.व्य.) |
| | ४. कबड्डी | ०२ कोर्ट | १२ मुले + ०१ (सं.व्य.) |
| | ५. मैदानी खेळ (Athletic) | ४०० मी. ट्रॅक | १२ मुले + ०१ (सं.व्य.) |
| | ६. बॅडमिंटन | ०२ कोर्ट | ०६ मुले + ०१ (सं.व्य.) |
| | ७. टेबल टेनिस | ०२ टेबल टेनिस कोर्ट | ०६ मुले + ०१ (सं.व्य.) |
| | ८. बुध्दिबळ | ०२ बोर्ड | ०६ मुले + ०१ (सं.व्य.) |
| | ९. फुटबॉल | फुटबॉल मैदान | १६ मुले + ०१ (सं.व्य.) |
| | | एकूण | ९४ मुले + ०९ (सं.व्य.) |
| ०४ | ए.आय.यु निवड चाचणी | | |
| | १. बॅडमिंटन | ऑडिटोरीअम / हॉल ४ ते ६ कोर्ट | प्रत्येक क्रीडा प्रकारासाठी अंदाजे १०० ते १२० विद्यार्थी (मुले / मुली) आणि क्रीडा शिक्षक (स्त्री / पुरुष) |
| | २. टेबल टेनिस | ऑडिटोरीअम / हॉल ८ टेनिस कोर्ट | |
| | ३. बुध्दिबळ | ऑडिटोरीअम / हॉल ४ बोर्ड | |
| | ४. फुटबॉल | फुटबॉल मैदान | |
| | ५. जलतरण | जलतरण तलाव २० मी., ५० मी. | |
| | ६. लॉन टेनिस | ऑडिटोरीअम / हॉल ४ टेनिस कोर्ट | |
| | ७. योगा | योगा हॉल | |
| | ८. क्रीकेट | स्टेडियम / मैदान | |

9/10/2024

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

MUHS

(सहपत्र - ब")

## विभाग व जिल्हानिहाय तक्ता

| .क्र | महसुल विभाग | विभागनिहाय जिल्ह्यामधील सर्व विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये | अंदाजित तारीख |
|---|---|---|---|
| ०१ | विभागीय निवड चाचणी | | |
| | मुंबई विभाग | मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागीरी, सिंधुदुर्ग | माहे ऑक्टोंबर २०२५ महिन्याच्या पहिल्या/दुसऱ्या आठवडयात |
| | पुणे विभाग | पुणे, कोल्हापुर, सांगली, सातारा, सोलापुर | |
| | नाशिक विभाग | नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार, अहमदनगर | |
| | औरंगाबाद विभाग | औरंगाबाद, बीड, हिंगोली, जालना, लातूर, नांदेड, उस्मानाबाद, परभनी, | |
| | नागपुर विभाग | नागपुर, वर्धा, भंडारा, चंद्रपुर, गडचिरोली, गोंदिया, | |
| | अमरावती विभाग | अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ, वाशिम | |
| ०२ | आंतरविभागीय निवड चाचणी | | |
| | वरील ०६ विभागांमधून निवड झालेले विद्यार्थी | | माहे ऑक्टोंबर २०२५ महिन्याच्या दुसऱ्या/तिसऱ्या आठवडयात |
| ०३ | सराव शिबीर (मुले व मुलीसाठी) | | |
| | "स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड" या विद्यापीठाच्या परिक्षेत्रात असलेले महाविद्यालय (आंतर विभागीय निवड चाचणी मध्ये गुणवत्तेनुसार निवड झालेले विद्यार्थी) | | माहे नोव्हेंबर २०२५ महिन्याच्या तिसऱ्या/चौथ्या आठवडयात |
| ०४ | क्रीडा महोत्सव २०२५ - २६ | | |
| | "स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड" (आंतरविभागीय निवड चाचणी व सराव शिबीरामध्ये सहभागी / निवड झालेले विद्यार्थी) | | राज्यपाल कार्यालयाकडून क्रीडा महोत्सवाच्या तारखा निश्चित झाल्यानंतर जाहिर करण्यात येतील |
| ०५ | ए.आय.यु व क्रीडा महोत्सवासाठी निवड चाचणी | | |
| | विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालये (बॅडमिंटन, टेबल टेनिस, बुध्दिबळ, जलतरण, लॉन टेनिस, योगा, क्रीकेट) | | माहे ऑगस्ट ते सप्टेंबर २०२५ महिन्याच्या पहिल्या/ दुसऱ्या आठवडयात |

9/10/2025

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

**Maharashtra University of Health Sciences, Nashik**

वणी दिंडोरी रोड नाशिक ,म्हसरूळ , - ४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004

Tel : (0253) 2539173/169/171/179 ☎ **Student Helpline** : 0253-2539111/6659111

Website: **www.muhs.ac.in** E-mail: **sw@muhs.ac.in**

**डॉ. देवेंद्र शेषराव पाटील**
**एम.डी.** (होमिओपॅथी)
संचालक , विद्यार्थी कल्याण

**Dr. Devendra Sheshrao Patil**
M.D. (Homoeopathy)
Director, Student Welfare


**जा.क्र.मआविवि/वि.क./रासेयो/1412/२०२५** **दि. 03/०९/२०२५**

**प्रति,**
**अधिष्ठाता/प्राचार्य**
**विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालये**
**मआविवि, नाशिक**

विषय : **"हरित महाराष्ट्र, समृध्द महाराष्ट्र" मोहिमेंतर्गत सन २०२५ करिता राज्यात १० कोटी वृक्ष लागवड करणेबाबत..**

**संदर्भ** : राज्य संपर्क अधिकारी,महाराष्ट्र शासन, रासेयो कक्ष मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र.संकीर्ण-२०२५/प्र.क्र.७९/ई-९३२२७४/रासेयो कक्ष, दि.२८/०८/२०२५.

**महोदय,महोदया/**

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय दि.११ जून २०२५ अन्वये **"हरित महाराष्ट्र, समृध्द महाराष्ट्र"** मोहिमेंतर्गत सन २०२५ करिता राज्यात १० कोटी वृक्ष लागवड करणेबाबतच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

**"हरित महाराष्ट्र, समृध्द महाराष्ट्र"** मोहिमेंतर्गत सन २०२५ करिता राज्यात १० कोटी वृक्ष लागवड करणेच्या अनुषंगाने ५ लक्ष वृक्ष लागवडीचे लक्ष्य व त्याचे गांभीर्य लक्षात घेवून, प्रत्येक कृषि व अकृषि विद्यापीठे, संचालनानये, अभिमत विद्यापीठे या अंतर्गत असलेले महाविद्यालये यांनी संस्थानिहाय किमान १५० वृक्षांची लागवड करणेबाबत निर्देश प्राप्त आहेत.

त्याअनुषंगाने **"हरित महाराष्ट्र, समृध्द महाराष्ट्र"** मोहिमेंतर्गत महाविद्यालय स्तरावर किमान १५० वृक्षांची लागवड करणेबाबत प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात यावी. व मोहिमेंतर्गत रोपे लागवडीची स्थळ नोंदणी/जिओ टॅगिंग इ. मुलभुत माहिती वन विभागाचे संकेतस्थळ www.mahaforest.gov.in अपलोड करण्यात यावी.

**संचालक,**
**विद्यार्थी कल्याण तथा**
**रासेयो कार्यक्रम समन्वयक**

**प्रत :** राज्य संपर्क अधिकारी, महाराष्ट्र शासन, रासेयो कक्ष, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.

E:\NSS 2025\Letter\SEP 2025.doc

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK
दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004
Tel:(0253) 2539171 ☎ Student Helpline:0253-2539111/6659111/100
Website: www.muhs.ac.in, e-mail: sw@muhs.ac.in

डॉ. राजेंद्र शिवाजी बंगाळ
एम.बी.बी.एस, एम.डी.(न्यायवैद्यकशास्त्र),डी.एन.बी, एल.एल.बी.
कुलसचिव

Dr. Rajendra Shivaji Bangal
M.B.B.S, M.D.( Forensic Medicine), D.N.B, L.L.B.
Registrar

जा.क्र.: मआविवि/वि.क./876 /२०२५ दि.18 /०६/२०२५

प्रति,
अधिष्ठाता/प्राचार्य
विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालये
मआविवि, नाशिक

**विषय : दि.२१ जून २०२५ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करणेबाबत..**

**संदर्भ** : मा.राज्यपाल कार्यालय, राज भवन, मलबार हिल, मुंबई यांचेकडील दि.११.०६.२०२५ रोजीचा ई-मेल..

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये मा.राज्यपाल कार्यालयाकडून प्राप्त पत्रात दिलेल्या निर्देशानुसार विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालयांमध्ये दि.२१ जून २०२५ रोजी आंतरराष्ट्रीय **योग दिन** साजरा करणेबाबत उक्त संदर्भीय पत्रान्वये निर्देशित करण्यात आलेले आहे.

त्याअनुषंगाने **दि.२१ जून २०२५ रोजी** विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालयांमध्ये **आंतरराष्ट्रीय योग दिन** साजरा करण्यात येवून याबाबतचा निवडक छायाचित्रासह सविस्तर अहवाल विद्यापीठास sw@muhs.ac.in या ई-मेलवर अहवाल सादर करण्यात यावा. अधिक माहितीसाठी उक्त संदर्भीय पत्रान्वये प्राप्त सविस्तर माहिती या पत्रा समवेत जोडून पाठविण्यात येत आहे.

18-6-25
कुलसचिव

सोबत :- वरीलप्रमाणे.
प्रत माहितीस्तव सादर :
१) मा.राज्यपाल कार्यालय, राज भवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा.कुलगुरु कार्यालय मआविवि, नाशिक.
३) मा.प्रतिकुलगुरु कार्यालय मआविवि, नाशिक.

E:\NSS 2025\Letter\June 2025 Registar LTR Head.doc